मंगळवार, ११ ऑक्टोबर २०२२

• वर्ष १५ • अंक ८४
www.ramprahar.com

# राम प्रहर

• पाने ८ • किंमत ₹२ • रायगड

अंतरंग

उद्योगवाढीसाठी महाराष्ट्रात उत्तम सुविधा -ना. गोयल/२
फूडमॉलमधील कर्मचाऱ्यांची खासगी बसवर दगडफेक/५
रायगड तायक्वांदो संघाचा राज्यस्तरीय स्पर्धेत दबदबा/७

## जेएनपीए बंदरातून ५०० कोटींचे ड्रग्ज जप्त



**उरण** : संत्र्यांच्या आडून १४७६ कोटींच्या अमली पदार्थांच्या तस्करीचे प्रकरण ताजे असतानाच आता नाशपाती, हिरव्या सफरचंदांच्या नावाखाली दक्षिण आफ्रिकेतून आयात करण्यात आलेल्या एका कंटेनरमध्ये ५०० कोटींहून अधिक किमतीचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. याआधी या महिन्याच्या सुरुवातीलाच संत्र्यांच्या एका खेपेतून १९८ किलो मेथ आणि नऊ किलो कोकेन असा १४७६ कोटी किमतीचा ड्रग्ज साठा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी अटक करण्यात आलेले आरोपी व गुप्त खबऱ्याकडून मुंबईच्या डीआयआय विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या माहितीनुसार जेएनपीए बंदरातून दक्षिण आफ्रिकेतून आयात होत असलेल्या नाशपाती आणि हिरवी सफरचंद घेऊन जाणारा कंटेनर अडवला असता कोकेनच्या विटा लपविल्याचे निदर्शनास आले. हे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे.

# शिंदेंकडे 'बाळासाहेबांची शिवसेना'

## ठाकरे गटाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे नाव आणि मशाल चिन्ह

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून उद्धव ठाकरे गट आणि एकनाथ शिंदे गटात निवडणूक चिन्ह आणि पक्षाच्या नावावरून रस्सीखेच सुरू होती. आपल्या पक्षाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव मिळावे, अशी मागणी दोन्ही गटांकडून केली होती. अखेर निवडणूक आयोगाने 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव शिंदे गटाला दिले आहे, तर उद्धव ठाकरे यांच्या गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' हे नाव दिले आहे.

दुसरीकडे निवडणूक आयोगाने चिन्हांबाबतही निर्णय दिला आहे. मशाल हे चिन्ह उद्धव ठाकरे गटाला दिले आहे, तर शिंदे गटाला पुन्हा नव्याने तीन चिन्हे सूचवा, असे निर्देश दिले आहेत. शिंदे गटाने मंगळवारी (दि. ११) सकाळी १० वाजेपर्यंत तीन चिन्हे निवडणूक आयोगाकडे सादर करायची आहेत. त्यानंतर शिंदे गटाच्या निवडणूक चिन्हाबाबत आयोग निर्णय घेणार आहे.

त्रिशूळ हे धार्मिक चिन्ह आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार हे चिन्ह राजकीय पक्षाला देता येणार नाही, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. या चिन्हावर दोन्ही गटांकडून दावा करण्यात आला होता, तर 'उगवता सूर्य' हे चिन्ह डीएमके पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. एका राजकीय पक्षाचे वापरातील चिन्ह असल्याने निवडणूक आयोगाने 'उगवता सूर्य' हे चिन्ह अमान्य केले आहे. त्यामुळे अखेरचा पर्याय म्हणून निवडणूक आयोगाने मशाल हे चिन्ह ठाकरे गटाला दिले आहे, तर शिंदे गट जी तीन चिन्हे नव्याने सादर करेल त्यातील एक चिन्ह निवडणूक आयोग त्यांना देणार आहे. त्यानंतर अंधेरी पोटनिवडणुकीत रंग भरणार आहेत.

# खांदा कॉलनीत रविवारी मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप महाशिबिर

### २डी इको तपासणी, हृदय शस्त्रक्रिया, विविध तपासण्या व औषधोपचार | जयपूर फूट, श्रवणयंत्र, नेत्रतपासणी व चष्मे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ, भारतीय जनता पक्ष पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि १६) खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार वाटप महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत हे महाशिबिर होणार आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने प्राथमिक तपासणी शिबिर तीन ठिकाणी झाले असून महाशिबिर येत्या रविवारी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे.

या महाशिबिरात सर्वसाधारण रोग, महिलांचे आजार, हृदयरोग, हाडांचे रोग, मधुमेह, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, बालरोग, त्वचा व गुप्तरोग तपासणी, दंतरोग तपासणी, नाक-कान-घसा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, ईसीजी तपासणी, कॅन्सर तपासणी, क्षयरोग तपासणी आणि औषधोपचार मोफत देण्यात येणार आहे. त्याचबरोबर ० ते १८ वयोगटापर्यंत २डी इको तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया, डोळ्यांची तपासणी व चष्मे वाटप, तसेच अपंगांना तीन चाकी सायकल वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र, देण्याबरोबरच मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूट बसविण्याचे शिबिरही या वेळी होणार आहे. आयुष्यमान भारत डिजिटल कार्डसुद्धा या शिबिरात तयार करून देण्यात येणार आहेत तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार आहे.

### अपंगांना तीन चाकी सायकल, प्रमाणपत्राचेही होणार वितरण

या महाशिबिरात साधू वासवानी मिशन पुणे, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट, एमजीएम हॉस्पिटल कामोठे व कळंबोली, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल नेरूळ, भारती विद्यापीठ खारघर, तेरणा मेडिकल कॉलेज नेरूळ, येरळा मेडिकल ट्रस्ट, साईट फर्स्ट केअर, नायर हॉस्पिटल, व्हिट सेंटर, शंकरा आय हॉस्पिटल, अपोलो हॉस्पिटल, टाटा कॅन्सर हॉस्पिटल परळ, सत्य साई संजिवनी हॉस्पिटल खारघर या नामांकित वैद्यकीय संस्थांचा सहभाग असणार आहे.

या महाशिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष तथा भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर यांनी केले आहे.

# संजय राऊतांचा मुक्काम तुरूंगातच

## न्यायालयीन कोठडीत १७ ऑक्टोबरपर्यंत वाढ



**मुंबई : प्रतिनिधी**

पत्राचाळ गैरव्यवहारप्रकरणी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या न्यायालयीन कोठडीत १७ ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तुरुंगातील मुक्काम वाढला आहे.

गोरेगाव येथील पत्राचाळ जमीन गैरव्यवहारप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ३१ जुलै रोजी संजय राऊत यांना अटक केली होती. राऊत यांनी जामिनासाठी पीएमएलए न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर २७ सप्टेंबरला सुनावणी झाली, मात्र कोर्टाने राऊतांना दिलासा दिला नव्हता. कोर्टाने जामीन अर्जावरील सुनावणी १० ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा राऊतांच्या कोठडीत सात दिवसांसाठी वाढ करण्यात आली आहे.

### वर्षा राऊत यांनाही समन्स

ईडी कोठडीत असलेल्या शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या पत्नी वर्षा राऊत यांनाही ईडीने चौकशीसाठी समन्स पाठविले आहे. पत्राचाळ गैरव्यवहार असो की अलिबागमधील जमिनीचे व्यवहार हे सर्व वर्षा राऊत यांच्या नावावर झाले आहेत, असा आरोप ईडीने केला असून याबाबत सत्र न्यायालयात कागदपत्रे सादर केली आहेत. त्यामुळे लवकरच वर्षा राऊत यांनाही ईडी कार्यालयात येऊन चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

# सपा नेते मुलायमसिंह यादव यांचे निधन

**गुरूग्राम : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पार्टीचे संस्थापक मुलायमसिंह यादव यांचे सोमवारी (दि. १०) निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते.



मुलायमसिंह यादव यांनी अगदी तरुण वयापासून राजकारणात सक्रिय सहभाग घेतला होता. १९९२ साली त्यांनी समाजवादी पार्टीची स्थापना केली. त्यांनी तीन वेळा उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले. ते केंद्र सरकारमध्येही मंत्री होते. संरक्षणमंत्रिपदाची महत्त्वाची भूमिका त्यांनी बजावली. लोक त्यांना नेताजी म्हणत. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

## निवडक

### रशियाने युक्रेनवर डागली क्षेपणास्त्रे, अनेकांचा मृत्यू

**किव्ह** : युक्रेन आणि रशियामधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत चालला असून रशियाने युक्रेनच्या विविध शहरांवर ७५ क्षेपणास्त्रे डागली आहेत. क्रिमियाला जोडणाऱ्या पुलावर युक्रेनने स्फोट घडविल्याच्या आरोपानंतर हा क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात अनेक जणांचा मृत्यू झाला असून बरेच जण जखमी झाले आहेत, अशी माहिती समोर येत आहे.

### हरमनप्रीतने रचला इतिहास, आयसीसी पुरस्कार जिंकला

**दुबई :** भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) सप्टेंबर महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जाहीर केला आहे. महिलांमध्ये हरमनप्रीतचा सामना भारताच्या स्मृती मानधना आणि बांगलादेशच्या निगार सुलतानाशी होता. निवडलेल्या तीनही खेळाडूंनी अलीकडच्या काळात वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. यात हरमनप्रीतने बाजी मारली.

# 'हायकल'च्या कामगारांना भरघोस पगारवाढ

## थकीत वेतनाचा फरकही मिळणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून तळोजा औद्योगिक क्षेत्रातील हायकल लिमिटेड कंपनीतील कामगारांना १६ हजार २०० रुपयांची भरघोस पगारवाढ तसेच विविध सुविधा देणारा करार भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत खांदा कॉलनीतील कामगार उपायुक्त प्रदीप पवार यांच्या दालनात झाला.



(छाया : योगेश पाटील)

जय भारतीय जनरल कामगार संघटना आणि हायकल लि. कंपनीत झालेल्या करारानुसार कामगारांना चार वर्षांसाठी प्रति महिना १६ हजार २०० रुपये, निवृत्तीनंतर दोन वर्षांसाठी मेडिकल पॉलिसी, **(पान २ वर..)**

> **कामगारांचे प्रश्न आपले आहेत असे समजून कामगार नेते जितेंद्र घरत काम करीत आहेत. कामगारांना न्याय देण्याच्या भूमिकेतूनच ते मार्गक्रमण करीत आहेत. कामगार आणि कंपनी व्यवस्थापन यामध्ये कायम समन्वय आवश्यक आहे आणि ते घडविण्याचे काम जितेंद्र घरत करीत आहेत.**
> **-आमदार प्रशांत ठाकूर, सल्लागार, जय भारतीय जनरल कामगार संघटना**

'एमसीए' निवडणूक

# खासदार शरद पवार आणि आमदार आशिष शेलार एकत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार आणि भाजप मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार हे मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) कार्यकारिणीच्या निवडणुकीत एकत्र आले आहेत. युती केल्याचे दोघांनी संयुक्त निवेदनाद्वारे जाहीर केले.

अध्यक्षपदासाठी आशिष शेलार, उपाध्यक्षपदासाठी अमोल काळे, सचिवपदासाठी अजिंक्य नाईक, संयुक्त सचिव दीपक पाटील, तर खजिनदारपदासाठी अरमान मलिकांना उमेदवारी दिली आहे. सदस्यपदासाठी जितेंद्र आव्हाड, मिलिंद नार्वेकर, निलेश भोसले यांच्यासह नऊ जण आहेत. त्यामुळे विविध पक्षांचे नेते या वेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनसाठी एका पॅनलमधून निवडणूक लढविणार आहेत. ही निवडणूक २० ऑक्टोबरला होणार असून खासदार शरद पवार आणि आमदार आशिष शेलार यांनी युती केल्याने समीकरणे बदललीत.

## उरण वायू विद्युत निर्मिती केंद्रात स्फोट | आणखी एकाचा मृत्यू

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या उरण तालुक्यातील बोकडवीरा येथील वायू विद्युत निर्मिती केंद्रात बॉयलरच्या पंपाचा भीषण स्फोट झाल्याने तीन जण गंभीररित्या भाजले होते. त्यातील ज्युनिअर इंजिनियर विवेक धुमाळे यांचा उपचारादरम्यान रविवारी मृत्यू झाला, तर सोमवारी (दि. १०) विष्णू पाटील (रा. बोकडवीरा) यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, बोकडविरा ग्रामस्थांनी सोमवारी कंपनीच्या गेटसमोर जमा होत विष्णू पाटील यांच्या वारसाला कायमस्वरूपी नोकरी व कुटुंबीयांना ५० लाख रुपयांची मदत करावी, अशी मागणी केली आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**




# पनवेलमध्ये रस्ता काँक्रीटीकरणाचे परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा





(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात अनेक कामे सुरू आहेत. त्या अंतर्गत माजी नगरसेवक मुकीद काझी यांच्या पाठपुराव्यामुळे प्रभाग क्रमांक १८मध्ये पाडा मोहल्ल्यातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. महापालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या या कामाचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १०) झाले.

या भूमिपूजन समारंभास माजी नगरसेवक नितीन पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, युवा नेते जवाद काझी, सुफयान पटेल, निसार सय्यद, मतीन मास्टर, जावेद मास्टर, निशार पटेल, अस्लम मास्टर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# कुख्यात आरोपीला अटक

## विक्की देशमुख साथीदारांसह पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुख्यात आरोपी विक्रांत उर्फ विक्की देशमुखला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्या व त्याच्या साथीदारांकडून पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत केला आहे. मोक्का, खुन खंडणी यांसारख्या गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या कुख्यात आरोपी विक्रांत उर्फ विक्की देशमुख आणि त्याच्या साथीदारांना गुन्हे शाखेने अटक केली आहे.

नवी मुंबईतील उरण, बेलापूर, नेरूळ, उलवे पनवेल अशा अनेक ठिकाणी विक्की देशमुख याने खंडणी मागितली होती. त्याला व त्याच्या साथीदारांना नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात घेतले असून विक्की देशमुख व त्यांच्या साथीदारांनी नवी मुंबईतील आणखी कोणाला दम देऊन खंडणी मागितली असेल तर त्यांनी नवी मुंबई पोलिसांकडे आपली तक्रार नोंदवावी अशी माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी दिली आहे. अनेक वर्षांपासून विक्की देशमुख याने पनवेल, उरण परिसरात दहशत निर्माण करून कोट्यवधी रुपयांची वसुली केली होती.

या संदर्भात माहिती देण्याकरिता बेलापूर येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली असून या पत्रकार परिषदेत विक्की देशमुख याच्यावर मोक्का कलमांतर्गत आता कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह यांनी दिली.



# खेरणे गावाला एक आदर्श ग्रामपंचायत देणार -बुधाजी माळी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खेरणे ग्रामपंचायतीमध्ये शिक्षणासाठी राजकारण केले जाते. गावात पिण्याच्या पाण्याची समस्या असून, रस्ते स्वच्छता, गटारे, वीज, रोजगार या समस्यांने ग्रामस्थ हैराण आहेत. यासर्वांवर मात करून अन्यायाला वाचा फोडून १६ ऑक्टोबरच्या निवडणुकीत खेरणे ग्रामस्थांना शैलेश माळी याच्या रूपाने कर्तव्यदक्ष सरपंच देवून एक आदर्श ग्रामपंचायत म्हणून नावारूपाला आणणार, असा आत्मविश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी सरपंच बूधाजी माळी यांनी व्यक्त केला.२००० साली मी सरपंच असताना खेरणे ग्रामपंचायतीला आशिया ग्लास (फ्लोट ग्लास)कडून कर रूपाने १४ लाख रुपये येत असताना त्यावेळी या ग्रामपंचायतीला आदर्श ग्रामपंचायत म्हणून नावारूपाला आणली होती. गावातील भांडणे गावातच मिटविला जात असल्याने ग्रामस्थांना पोलीस ठाणे काय हे माहीत नव्हते. शिक्षणासाठी प्राधान्य दिले जात होते, पण आता शिक्षणामध्ये राजकारण आणले जाते. दाखले देताना त्रासदायक वागणूक दिली जातेय. त्यांच्याकडून काही तरी मागणी केली जाते नियोजनशुन्य कारभारामुळे सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने मुख्य रस्त्यावर पाणीच पाणी होत आहे. घाण कचऱ्याचे कोणतेही व्यवस्थापन नसल्याने सगळीकडे घाणीचे साम्राज्य आहे. त्यामुळे नागरिकांना अनेक साथीच्या रोगांना बळी पडावे लागते. सत्ताधारी शेकापने २५ वर्ष एक हाती सत्ता करताना ग्रामस्थांना वाऱ्यावर सोडले आहे. गावात समस्याच समस्या निर्माण केल्या आहेत, पण आता गावकऱ्यांनी निर्धार केला आहे की शेकापची ही सत्ता उलथून टाकून सर्वसामान्यांचे भाजाच्या सरपंच पदाचे उमेदवार शैलेश माळी यांच्या हाती देणार आहेत. माळी गेली दोन वर्षांपासून विधवा, निराधार गरीब गरजू ६० महिलांना प्रत्येक महिन्याला लागणारे रेशन मोफत देत आहेत. गरिबांची जाण असलेल्या व्यक्तीच्या हाती कारभार देऊन गावाला विकासाबाबत उच्च शिखरावर पहाण्यासाठी नागरिक आतुरतेने वाट पाहत आहेत आणि ते या ग्रामपंचायत निवडणुकी २५ वर्षांच्या शेकापच्या सत्तेला सुरुंग लावतील, अशा आत्मविश्वास बुधाजी माळी यांनी व्यक्त केला.






**उलवे नोड : कोजागिरी पोर्णिमा रविवारी सर्वत्र साजरी झाली. यानिमित्त रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या वतीने नॉन स्टॉप डीजे आणि गरब्याचे आयोजन केले होते. या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दांडियाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)




**पनवेल : तालुक्यातील कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत तसेच आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, दिघाटी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# करंजा येथे बर्फ क्रशिंग मशीनचे उद्घाटन



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील करंजा येथे नवापाडा नाखवा मंडळ यांच्या वतीने मच्छीमार बांधवांसाठी बर्फ क्रशिंग मशीनचे सोमवारी (दि. १०) आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डि. के. कोळी यांनी आमदार महेश बालदी यांचे स्वागत केले. आमदार महेश बालदी यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. करंजा बंदरात प्रथमच बर्फ क्रशिंग मशीन आणली आहे, असे दीपक नाखवा यांनी सांगितले. या वेळी आमदार महेश बालदी, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, नगरसेवक राजेश ठाकूर, माजी नगरसेवक राजेश कोळी, नारायण नाखवा, सागर नाखवा, दीपक नाखवा, भानुदास नाखवा, डि. के. कोळी, चाणजे ग्रामपंचायत उपसरपंच सोनाली जयेश ठाकूर, मदन कोळी, भाजप कार्यकर्ते, करंजा ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

समुद्रात जेव्हा भरती असायची तेव्हा बोटी जास्त उंच पाण्यावर जात असत त्या वेळेस बोटीमध्ये बर्फ टाकण्यास मुष्कील होत असे. समुद्राची ओहोटी येईपर्यंत बोटींना थांबावे लागत त्यामुळे वेळेचा अपव्यय होत असे आता आधुनिक पद्धतीची बर्फ क्रशिंग मशीन आणल्याचे भरतीच्या वेळेस बोटीमध्ये बर्फ सहजगत्या टाकू शकतो अशी व्यवस्था आहे. ओहोटीपर्यंत वाट बघावी लागणर नाही. त्यामुळे मच्छीमार बांधवांना याचा खूप फायदा होईल, अशी माहिती दीपक नाखवा यांनी या वेळी दिली.

# पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकाची स्वच्छता

## माजी नगरसेवक राजू सोनी यांची तत्परता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकाची स्वच्छता करून दिली आहे. यामुळे शिवप्रेमींनी त्यांचे आभार मानले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात अस्वच्छता व कचरा साठला होता. याबाबत शिवप्रेमींनी त्यांच्यासमोर कैफियत मांडताच तत्परतेने त्यांनी स्वतः कडील कामगार लावून तो चौक व परिसर संपूर्ण साफसफाई करून स्वच्छ करून दिला. त्याबद्दल शिवप्रेमींनी सोनींचे आभार मानले.





**उलवे नोड : सेक्टर ९ येथे नव्याने शिवलीला सिल्क हे साड्यांचे दुकान सुरू झाले आहे. या दुकानाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी त्यांनी दुकानाचे मालक कस्तुरी लक्ष्मण नारायण, कस्तुरी लक्ष्मण आणि कस्तुरी आनंद यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माधुरी श्रीनिवास कोडरू, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप युवा नेते निलेश खारकर, मसानम स्वामी, वसाला श्रीधर, श्री पीइलई, कुमार स्वामी आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

# शुल्लक कारणावरून एकास मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये एका अनोळखी मोटरसायकलस्वाराने वाहन बाजू देण्याच्या कारणांवरून एका व्यक्तीला मारहाण केल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस स्थानकात दाखल करण्यात आली आहे. खारघरमधील नवलोकहित दृष्टी या साप्ताहिकाचे संपादक संदेश सोनमळे यांना एका अज्ञात मोटर सायकलस्वाराने सेंट्रल पार्कच्या रस्त्यावरती वाहनाला बाजू देण्याच्या कारणांवरून मारहाण केली. याबाबतची तक्रार संदेश सोनमळे यांनी खारघर पोलीस स्थानकात दाखल केली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.



**खारघर : आमदार प्रशांत ठाकूर यांचे धाकटे सुपुत्र अपूर्व ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सेक्टर १२ गिरिजा आश्रमातील मुलांना व वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठांना स्नेहभोजन आणि सर्व मुलांना शाळेचे शूज देण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर मुलांच्या आनंदात सहभागी झाले. या कार्यक्रमास भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, गुरुनाथ गायकर, संतोष शर्मा, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, नवनीत मारू आदी उपस्थित होते.**

# वृध्दाश्रमात फळे, धान्याचे वाटप





**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे नातू सार्थक हरेश पाटील व नात संस्कृती हरेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांना फळे आणि धान्याचे वाटप करण्यात आले. दरम्यान, सार्थक आणि संस्कृतीचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, शांताराम पोपेटा, वडील हरेश पाटील, आई शितल पाटील आदी उपस्थित होते.**




**खारघर : येथे नव्याने बॉर्न फुडी कॅफे ॲण्ड द लस्सी कॉर्नर सुरू झाले आहे. भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर उपाध्यक्ष सुहासिनी केकाणे यांचे सुपुत्र राहुल केकाणे आणि जावई प्रशांत गुप्ता यांनी हे कॅफे सुरू केले आहे. या कॅफेला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत राहुल केकाणे आणि प्रशांत गुप्ता यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नितीन पाटील, माजी नगरसेविका नीता माळी, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, उमेश इनामदार, सुहासिनी केकाणे, डॉ. सोनिया शितोळे, अंजली इनामदार, सुनीता कांबळे, चंद्रकांत मंजुळे, नीता मंजुळे, भारती एकबार, जयश्री भोसले, गीता चौधरी, आभासिंग विशाखा, भारती एकलारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि केकाणे कुटूंबीय उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)

## संपादकीय

# बुडत्याला काडीचा आधार

अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीमध्ये ठाकरे गटाच्या उमेदवारास राष्ट्रवादी काँग्रेसने आपले पाठबळ जाहीर केले होते. काँग्रेसदेखील समर्थनाच्या तयारीत आहे. उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन सोमवारी काँग्रेस नेत्यांनी आपला इरादा जाहीरदेखील केला. मुंबईमध्ये काँग्रेसला थोडेफार तरी स्थान आहे, पण राष्ट्रवादीचे तसे काही नाही. त्यामुळे हे पाठबळ असूनही ठाकरे समर्थक गटाची अवस्था डामाडोलच आहे.

**सुटकेचे सर्व मार्ग बंद झाले की आधारासाठी संकटग्रस्त व्यक्ती कुठेही धाव घेते. राजकारणामध्येसुद्धा कधी कधी अशाच प्रकारचे चित्र दिसते. महाराष्ट्रातील राजकारण गेल्या काही दिवसांपासून प्रचंड तापू लागले आहे. दसरा मेळाव्यापासून राजकीय पक्षांमध्ये निकराची हातघाई सुरू झाल्याचे दिसत आहे. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा समर्थक गट आणि ठाकरे समर्थकांचा गट यांच्यामध्ये तुंबळ युद्ध सुरू झाले आहे. त्याचे खापर मात्र ठाकरे समर्थक भारतीय जनता पक्षावर फोडतात, ते हास्यास्पद आहे. भाजपपुरते बोलायचे झाल्यास भाजपचा प्रभाव आणि लोकप्रियता अवघ्या देशभरात दिवसागणिक वाढतच चालली असून निवडणूक चिन्हदेखील अत्यंत प्रभावीपणे जनमानसामध्ये भिनत चालले आहे. त्यामुळे असुयेपोटी की काय, आपल्या अध:पतनाबद्दल अन्य पक्षांकडून दूषणे याच पक्षाला दिली जातात. मुंबईतील अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पोटनिवडणूक होऊ घातली आहे. शिवसेनेचे आमदार रमेश लटके यांच्या निधनानंतर रिक्त झालेली ही जागा लढवण्याची घोषणा भारतीय जनता पक्षाने या अगोदरच केली आहे. महाविकास आघाडीतर्फे ठाकरे गटाने दिवंगत आमदार लटके यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपच्या उमेदवाराबाबत भाजप आणि शिंदे गटात चर्चा झाल्याचे सांगितले जाते. ठाकरे समर्थकांनी मोठा गाजावाजा करत आपला उमेदवार जाहीर केला खरा, पण त्यानंतर त्यांच्याकडे स्वत:चे मूळ निवडणूक चिन्हच उरले नाही. अशा परिस्थितीत ठाकरे गटाची अवस्था काय असेल हे वेगळे सांगायला नको. भाजपच्या उमेदवाराला पराभूत करणे त्या पक्षाच्या क्षमतेच्या बाहेरचे आहे. गेल्या निवडणुकीत भाजपचे बंडखोर उमेदवार मुरजी पटेल यांना शिवसेनेच्या विरोधात ४५ हजार मते मिळाली होती. यावेळेस तर शिवसेनेच्या ठाकरे समर्थक गटाची ताकद कमालीची घटलेली असेल. अंधेरी पूर्व मतदारसंघाची पोटनिवडणूक ठाकरे समर्थकांनी प्रतिष्ठेची केली आहे, पण ही निवडणूक गमावल्यास ठाकरे समर्थकांचे उरलेसुरले नीतीधैर्य देखील रसातळाला जाईल आणि पाठोपाठ होणाऱ्या आगामी महापालिका निवडणुकीत त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतील. त्यामुळे काहीही करून अंधेरी पूर्वचा गड जिंकायचाच या इराद्याने ठाकरे समर्थकांना पेटून उठावेच लागेल. त्यासाठीच उद्धव ठाकरे यांनी फेसबुकच्या माध्यमातून आक्रमक बाणा दाखवत आपल्या उरल्यासुरल्या कार्यकर्त्यांमध्ये उमेद पेरण्याचा प्रयत्न केला. अर्थात या सगळ्याला आता खूप उशीर झाला आहे. त्यांना पाठबळ देऊ पाहणारे दोन्ही पक्ष भाजपपुढे पूर्णत: निष्प्रभ ठरले आहेत. ठाकरे गटाची वाटचालही त्याच दिशेने होताना दिसते. भाजपचे कार्यकर्तेदेखील पूर्ण तयारीने मैदानात उतरतील हे वेगळे सांगायला नको. महाराष्ट्र नवनिर्माण सेनादेखील मतांचा आपला वाटा उचलेलच. थोडक्यात, काडीचा आधार शोधूनदेखील ठाकरे गटाच्या नाकातोंडात पाणी गेल्याशिवाय राहणार नाही हेच खरे वास्तव आहे.**

# कोकणातील आपत्ती रोखायला हव्यात!

गेल्या काही वर्षांत कोकणात सातत्याने आलेल्या आपत्तींमुळे कोकणची निसर्गसंपत्ती व कोकणवासियांचे जीवनमान यावर सातत्याने आघात होत आहे. त्यामुळे या आपत्ती रोखण्यासाठी सार्वत्रिकरित्या प्रयत्न होणे गरजेचे आहे. तांत्रिकदृष्ट्या ‘निसर्गनिर्मित’ अशी नोंद असलेल्या आपत्तींचे अलिकडच्या काळातील सततच्या होणाऱ्या आगमनामुळे या आपत्ती ‘मानवनिर्मित’ असल्याचे स्पष्ट झाले आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल हरवल्याने कोकणची कोंडी झाली आहे. नैसर्गिक संपत्ती मुबलक असलेला आणि निसर्गाने भरभरून दिलेल्या वरदानामुळे वेगळे आकर्षण ठरलेल्या कोकणला आपत्तींचे ग्रहण लागलेले आहे.



कोकणवासीयांनी जमिनी विकण्यासह पर्यटन विकास म्हणून केलेली रिसॉर्टसह सर्व प्रकारची स्थापत्यकामे अधिकाधिक पर्यावरण स्नेही कशी होतील, याकडे लक्ष द्यायला हवे आहे. कोकणातल्या वर्तमान आपत्ती बेसुमार वृक्षतोडीचा परिणाम आहे. उन्हाळ्यात लावले जाणारे वणवे, वाढती लोकसंख्या, वाहने, औद्योगिकरण, कचरा, गाळाने भरलेल्या नद्या, धरणे, तलाव आदी प्रकारच्या निसर्गाच्या छेडछाडीमुळे आपत्ती वाढल्या आहेत. हवामान बदलाचे दुष्परिणाम आज देशभर भोगावे लागताहेत, त्यात कोकणही मागे नाही. कोकणात महापुराच्या पातळीने आधीचे विक्रम मोडीत काढले आहेत. कोकण आणि त्याला जोडलेल्या पश्चिम घाटातील सह्याद्रीचा परिसर हा पारंपरिक प्रचंड पावसाचा प्रदेश आहे. त्याच्या पूर्व–पश्चिमवहन मार्गातील वनश्री संपुष्टात आल्याने तो जमिनीत न झिरपता थेट एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे धावत सुटतो आहे. कोकण भूमीत २००५ सालचा महापूर, २००९ सालचे फयान चक्रीवादळ, २०२० सालचे निसर्ग चक्रीवादळ, २०२१चे तोक्ते चक्रीवादळ २००५च्या महापुरातील उंचीचे सारे रेकॉर्ड ब्रेक करणारा जुलै २०२१चा महापूर आणि त्याच्या जोडीला सह्याद्रीत कधी नव्हे इतक्या घडणाऱ्या भूस्खलनाच्या घटना धक्कादायक आहेत.

मागील वर्षी कोकणात २२ ते २३ जुलै २०२१च्या दरम्यानही खूप मोठा पाऊस पडला. कोकणातील नद्यांना पूर येण्यात नावीन्य नाही, पण महापुराचा विचार आणि उपाययोजना करताना नदीची व्यवस्था नीट समजून घ्यावी लागेल. ती समजून घेतल्यानंतर त्याद्वारे येणारे निष्कर्ष जमिनीवर उतरविणाऱ्या सर्व संबंधितांना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण द्यावे लागेल. कोकणातील नद्यांचे पात्र पावसाळ्यात फुगते. यंदा महापूरग्रस्त शहरातून वाहणाऱ्या नद्यांचे गाळ काही प्रमाणात का होईना काढले गेलेत. कोकणातील बहुतांश दरडी या डोंगराळ भागात आणि मुसळधार पावसाळ्याच्या दिवसात कोसळतात. डोंगरांचा विध्वंस थांबविला नाही तर पुढील काळात मोठ्या दुर्घटना घडतील अशी स्पष्ट भूमिका ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ गेल्या काही वर्षांपासून सातत्याने मांडत आले आहेत.

कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गला अतिवृष्टी आणि महापूराचा तडाखा बसला की हजारो कोटींची हानी होते. कोकणातील आपत्ती आणि निसर्गहानी विषयासंदर्भातील आजवरच्या साऱ्या अहवालांचे एकत्रीकरण करून त्यातून तज्ज्ञांच्या साहाय्याने परिणामकारक उपाययोजना निश्चित करणे, महाड आणि चिपळूणमधील महापूर नियंत्रणासाठी तज्ज्ञ समितीच्या अहवालानुसार वशिष्ठी, गांधारी, सावित्री नदीतील गाळ व कचरा काढणे, मॉडेल स्टडीच्या आधारे पूर संरक्षण भिंत उभारणे, डोंगर कोसळण्याच्या घटना आणि कोयना अवजलाच्या वापराचा मुंबई लिंक प्रकल्पासाठी निर्णय घेणे, कोकणच्या २६ नदीखोऱ्यात पूर इशारा देणारी आरटीडीएस प्रणाली निर्माण करणे, आपत्कालीन बचाव यंत्रणा उभी करणे आदी मुद्यांचा समावेश आहे. ही कामे व्हायला हवी आहेत.

चिपळूणचे पाणलोट क्षेत्र हे दक्षिणेकडे कुंभार्ली घाटमाथा ते उत्तरेकडे श्रीक्षेत्र नागेश्वर–वासोटा किल्ला आणि पश्चिमेच्या बाजूला वशिष्ठी नदीच्या खाडीकिनारी चिपळूण शहर असे विस्तारलेले आहे. या सर्व क्षेत्रातील पावसाचा एकत्रित परिणाम म्हणून चिपळूणला महापूर येत असतो. चिपळूणच्या पूर्वेकडील चिपळूण ते सह्याद्री या पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या उपनद्यांमध्ये योग्य ठिकाणी नियंत्रित जलनिस्सारण तत्त्वाप्रमाणे लहान–मोठी धरणे बांधून पाणी अडवून ठेवले, तर चिपळूणला येणाऱ्या महापुराची तीव्रता कमी होईल. दुसऱ्या राज्य सिंचन आयोगाने धरण क्षमता वशिष्ठी खोऱ्यात प्रस्तावित केलेली आहे. या प्रस्तावित धरणक्षेत्रात मानवी वस्ती फारशी नसल्याने तेथे विस्थापितांचाही प्रश्न नाही आहे. धरणे ही निसर्ग आणि पर्यावरणाला पूरक नाहीत हे सत्य असले तरी बिघडलेल्या पर्यावरणीय वातावरणात कोकणातील महापुरासारख्या आपत्ती रोखण्यासाठी सह्याद्रीत लहान–मोठी धरणे हाच पर्याय अधिक संयुक्तिक वाटतो आहे.

जिथे नद्या, ओढे समुद्राला मिळतात तिथल्या चिखलाट जमिनीत फोफावणारी खारफुटीची जंगलं समुद्राच्या लाटांचा हल्ला पेलतात, ती टिकवायला हवीत. कोकणात काही समुद्रकिनारे खडकाळ आहेत, काही रेतीच्या पुळणीचे आहेत. खारफुटी नसलेल्या काही किनाऱ्यांवर ब्रिटिशपूर्व काळात स्थानिकांनी उंडीच्या झाडांची एक तटबंदी उभारलेली होती. त्सुनामी, वादळ, महापूर काळात पाण्याचा लोंढा रोखून आजूबाजूच्या परिसरामध्ये पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी खारफुटीची मदत होते. खारफुटीची जंगले देखणी वाटत नसली तरी परिसंस्थेमध्ये त्यांचे महत्त्व मोठे आहे. कोकणातील समुद्रकिनारे वाऱ्यापासून संरक्षित करावे लागणार आहेत. यासाठी जास्तीत जास्त किनाऱ्यांवर सुरू, केतकी/केवडा यांची लागवड करावी लागेल. कोकणात आपत्ती रोखण्यासाठी सर्वच ठिकाणी निसर्गाच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रिया सुरू व्हायला हवी आहे, असे ज्येष्ठ जलतज्ज्ञ आणि आंबा उत्पादनाशी निगडीत डिफ्युझर तंत्रज्ञानाचे जनक विजय जोगळेकर यांचे मत आहे.

जलतज्ज्ञ डॉ. उमेश मुन्डल्ये यांच्या मतानुसार, आपल्याला कोकणासह देशभरात स्थलानुरूप उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. जलसंधारणाची कामे स्थलानुरूप असणे आवश्यक आहे. त्यामुळे सरसकट सर्वत्र एकाच प्रकारचे काम न करता, लोकसंख्या, पाणी साठवण्याची क्षमता, नदीच्या पात्राची रुंदी, खोली, आजूबाजूच्या परिसरातील शेतजमिनी आणि वस्त्यांचे प्रमाण इत्यादी बाबींचा अभ्यास करून मग कामे केली, तर कोणाचेच नुकसान न होता सर्वांचा फायदा होऊ शकतो.

महाराष्ट्र शासन, वनविभाग आणि सामाजिक वनीकरण यांनी आपल्या वृक्ष लागवड आणि रोपे निर्मिती कार्यक्रमातून विदेशी वृक्ष प्रजातींना वगळावे. वृक्षारोपणामध्ये केवळ स्थानिक वृक्ष प्रजातींना प्राधान्य द्यावे याबाबतचा धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे. नैसर्गिक संकटे ही माणसासाठी नवी नाहीत, पण अलिकडची पर्यावरणीय संकटे अधिक मानवनिर्मित आहेत.

सह्याद्रीच्या मुख्य धारेपासून स्वतंत्र असलेली कोकणभूमी म्हणजे निसर्गाचे वरदान लाभलेला प्रदेश. अशी नैसर्गिक संपन्नता क्वचितच कोणत्या प्रदेशाला मिळाली असेल. मात्र बदलत्या निसर्गचक्रामुळे कोकणातल्या लोकांना निर्धास्त जगणे अवघड होईल की, काय? अशी स्थिती येऊन ठेपली आहे.

आगामी काळात कोकण भूमीचा विचार करताना आम्हाला संकुचित विचारातून बाहेर येत सर्व प्रकारच्या छोट्या–मोठ्या पर्यावरणीय उपक्रमांना आमच्या सार्वजनिक जीवनात प्राधान्यक्रम द्यावा लागेल. कोकणच्या पर्यावरणाला धक्का लावणाऱ्या प्रत्येक मुद्याबाबत सामुहिक भूमिका ठरवावी लागेल. कोकणातील आमच्या आजूबाजूच्या पर्यावरणीय समस्या समजून घेऊन त्यावरील उपाययोजना सांगणारी, दैनंदिन भौतिक सुविधा कमी करणारी ‘इको’ जीवनपद्धती अंगीकारावी लागेल. कोकणच्या स्वर्गीय सौंदर्याला लागलेले आपत्तींचे ग्रहण थोपविण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

**–धीरज वाटेकर, चिपळूण.**

## बदलते तंत्रज्ञान

# ‘हा’ रिचार्ज केल्यावरच घेता येणार जीओ ५जी सेवेचा लाभ

देशात बहुप्रतिक्षित अशा ५जी नेटवर्कला सुरुवात झाली आहे. जीओ आणि एअरटेल या दोन्ही कंपन्यांनी आपल्या ५जी सेवेची घोषणा केली आहे. जीओने सुरुवातीला चार शहरांमध्ये आपली सेवा सुरू केली आहे. यामध्ये दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि वाराणसी या शहरांचा समावेश आहे. या शहरांमध्ये ग्राहकांना जीओ ५जी चा अनुभव मिळत आहे. कंपनी आपली ५जी सेवा वापरण्यासाठी वेलकम ऑफरदेखील देत आहे. या अंतर्गत युजर्सना १ जीबीपीएसच्या स्पीडने अनलिमिटेड डेटा मिळत आहे.



गेल्या आठवड्यात रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी पुष्टी केली की, पॅन इंडिया जीओ सेवा २०२३ डिसेंबरपर्यंत रोलआउट होईल, तर एअरटेलने म्हटले आहे की मार्च २०२४पर्यंत त्यांची ५जी सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल. जीओने पात्र वापरकर्त्यांसाठी वेलकम ऑफरची घोषणा केली. आता हे पात्र वापरकर्ते कोण आहेत व ही वेलकम ऑफर कशी मिळविता येईल, जाणून घेऊया सविस्तर...


जीओने आमंत्रण कसे कार्य करते याबद्दल बरेच तपशील उघड केले नसले तरी, टेलिकॉम टॉककडून येणारा अहवाल सुचित करतो की, वेलकम ऑफर आमंत्रण माय जीओ ॲपवर दिसेल. जीओ निवडक युजर्सना ५जी सेवेचा अनुभव घेण्यासाठी आमंत्रणे पाठवत आहे. तुम्हाला हे आमंत्रण माय जीओ ॲपवर मिळेल. यासाठी तुम्हाला माय जीओ ॲपवर जावे लागेल आणि तुम्हाला आमंत्रण आले की नाही, हे नोटिफिकेशमध्ये तपासावे लागेल.

तसे, तुम्हाला माय जीओ ॲपवर त्याचे आमंत्रण होमपेजवरच दिसेल. कंपनीने या आमंत्रणावर एक अटही ठेवली आहे. ज्याची माहिती ऑफरमध्ये देण्यात आलेली नाही. जीओ ५जी सेवेचा अनुभव फक्त अशा ग्राहकांचा मिळेल, ज्यांनी किमान २३९ रुपयांचा रिचार्ज केला आहे. म्हणजेच वेलकम ऑफरचा लाभ फक्त अशा ग्राहकांना मिळेल, ज्यांच्या फोनवर २३९ रुपये किंवा त्याहून अधिक रिचार्ज असेल.

कंपनीने सांगितल्याप्रमाणे, पोस्टपेड आणि प्रीपेड दोन्ही ग्राहकांना जिओ ५जीचा लाभ मिळेल, जर त्यांनी रुपये २३९ किंवा त्यापेक्षा जास्त रिचार्ज केले असेल. टेलिकॉम रिपोर्टनुसार, जर तुमच्या फोनमध्ये यापेक्षा कमी रिचार्ज असेल तर तुम्ही जीओ वापरु शकणार नाही. या ब्रँड्सवर उपलब्ध असलेली सेवा जीओने दसऱ्याच्या मुहूर्तावर चार शहरांमध्ये सुरू केली आहे.

# हिंदी चित्रपटसृष्टीचा ‘बिग बी’

चित्रपटसृष्टीतील महान अभिनेता म्हणून अमिताभ बच्चन यांचे नाव घेतले जाते. त्यांचा जन्म अलाहाबाद येथे ११ ऑक्टोबर १९४२मध्ये झाला. त्यांचे वडील हरिवंशराय बच्चन हे हिंदी साहित्यातील ख्यातनाम कवी होते. त्यांच्या आईचे नाव तेजी बच्चन.



## निमित्त

अमिताभ बच्चन यांचे पूर्वाश्रमीचे नाव इंकीलाब श्रीवास्तव होते, पण त्यांचे वडील हरिवंशराय बच्चन यांनी आपल्या मित्राच्या सल्ल्यानुसार त्यांचे नाव अमिताभ ठेवले. ‘अमिताभ’ या नावाचा अर्थ असा होतो की, कधीही न संपणारा प्रकाश. अमिताभ बच्चन यांचे वडील हरिवंशराय बच्चन हे जातीपाती आणि धर्म मानत नव्हते. त्यामुळे त्यांनी आपले श्रीवास्तव हे आडनाव बदलून त्याऐवजी बच्चन असे ठेवले. बच्चन या नावाचा अर्थ होतो निरागस.

त्यानंतर हरिवंशराय श्रीवास्तव हे हरिवंशराय बच्चन याच नावाने प्रसिद्ध झाले. अमिताभ बच्चन यांचे शाळेमधील नावही असेच होते. त्याच नावाने ते लोकप्रिय झाले आणि त्यांनी त्याच नावाचा प्रयोग आपल्या येणाऱ्या आयुष्यातही केला आणि अजूनही करीत आहेत.

अमिताभ बच्चन यांचे शिक्षण अलाहाबादच्या ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण नैनितालच्या शेरवूड महाविद्यालयात झाले आणि त्यानंतर दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी संपादन केली. त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीला कोलकाता येथे एका कंपनीत काम केले. नंतर चित्रपटात संधी शोधण्यासाठी ते मुंबईत दाखल झाले. मुंबईत त्यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी (१९६९) या चित्रपटात सर्वप्रथम भूमिका मिळाली. त्यानंतर हृषीकेश मुखर्जी दिग्दर्शित आनंद (१९७१) या चित्रपटात त्यावेळचे लोकप्रिय सुपरस्टार कलाकार राजेश खन्ना यांच्या समवेत काम करण्याची त्यांना संधी मिळाली. त्यांनी आनंदमधील भूमिकेचे सोने केले. त्या वर्षीचा सर्वोष्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कारही त्यांना मिळाला.

ज्येष्ठ अभिनेत्री व खासदार जया बच्चन (भादुरी) या त्यांच्या पत्नी होत. १९७३मध्ये त्यांचा विवाह झाला. त्यांचे पुत्र अभिषेक बच्चन व सून ऐश्वर्या राय हेही हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे सुप्रसिद्ध कलावंत आहेत. आतापर्यंत अमिताभ बच्चन यांना १४ वेळा फिल्मफेअर पुरस्कार, तर दोन वेळा उत्कृष्ट अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून, भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या किताबांनी गौरविले आहे. याशिवाय अनेक मानद उपाध्याही त्यांना मिळाल्या आहेत. विदेशांतही त्यांचे सन्मान झाले आहेत.

२०००मध्ये ’कौन बनेगा करोडपती’ या दूरचित्रवाणीवरील प्रश्नमंजुषा मालिकेने त्यांच्या लोकप्रियतेत अधिकच भर घातली. दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कसे करावे, याचा आदर्श वस्तूपाठच बच्चन यांनी आपल्या निवेदनाने घालून दिला. आजही ही मालिका भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासातील सर्वाधिक लोकप्रिय व वाहिन्यांना सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारी मालिका म्हणून ओळखली जाते. अमिताभ बच्चन यांची कारकीर्द अद्यापही चालू असून वयाच्या सत्तरीतही ते तरुणांना लाजवेल, अशा उत्साहात कार्यरत आहेत. त्यांचे एकूण व्यक्तिमत्त्व अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

**–साभार विकासपीडिया, मराठी विकी**

## क्लिक...क्लिक...!




**महाड : किल्ले रायगडावर सुटीनिमित्त पर्यटकांची झालेली गर्दी.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# काकडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल होते कमी

बदलत्या जीवनशैलीमुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार यांचे प्रमाण वाढले आहे. शरीर निरोगी रहावे यासाठी योग्य आणि पुरेपूर आहार घेणे गरजेचे असते. त्यासाठी हिरव्या पालेभाज्या, फळं अशा शरीराला सुदृढ बनवण्यासाठी मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश केला जातो. बहुतांश वेळा जंक फुड किंवा तेलकट पदार्थांचा समावेश असणाऱ्या जेवणामध्ये सॅलेडचा समावेश करून समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो. सॅलेडमध्ये प्रामुख्याने काकडीचा समावेश केला जातो.



काकडीमध्ये अनेक अँटिऑक्सिडंट आढळतात. काकडीमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते त्यामुळे काकडी खाल्ल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते, तसेच वजन कमी करण्यासाठी, शरीराला डिटॉक्स करण्यासाठी काकडीचा आहारात समावेश केला जातो. असे अनेक फायदे असणारी काकडी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल कमी होते असे मानले जाते. काकडी यासाठी कशी फायदेशीर ठरते जाणून घ्या.

**उच्च कोलेस्ट्रॉलसाठी काकडी अशी ठरते फायदेशीर**

* मेडिकल न्यूज टुडेमध्ये दिलेल्या माहितीनुसार काकडी खाल्ल्याने शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल कमी होऊन, शरीरासाठी फायदेशीर असणारा कोलेस्ट्रॉल वाढतो.
* तेलकट आणि दुग्धजन्य पदार्थांमुळे शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढू शकतो. यावर उपाय म्हणजे काकडी खाल्ल्यने शरीरासाठी फायदेशीर असणारा कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत मिळते.
* कोलेस्ट्रॉल वाढल्यास लठ्ठपणा आणि मधुमेह अशा समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवणे गरजेचे असते. यासाठी काकडी खाणे फायदेशीर ठरू शकते.
* ‘हेल्थ लाईन’ या आरोग्याविषयक माहिती देणाऱ्या वेबसाइटनुसार काकडीमध्ये अनेक पोषकतत्त्व आढळतात, त्यामुळे दैनंदिन आहारात याचा समावेश करावा.
* काकडी कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्याबरोबर फॅट बर्न करण्यासह मदत करते. यामध्ये असणाऱ्या फायबरमुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकले जातात.

# माणगावात ४० किलो रक्तचंदन जप्त





**माणगाव : प्रतिनिधी**

संशयित वॅगनार मारुती कारचा १० किमीचा पाठलाग करून माणगाव पोलिसांनी सोमवारी (दि. १०) इंदापूर येथून ४० किलो रक्तचंदन हस्तगत करून तीन आरोपींना ताब्यात घेतले.

रक्तचंदन विकण्यासाठी आले असल्याची माहिती मिळताच माणगाव पोलिसांनी सोमवारी दुपारी रक्तचंदन विकणाऱ्यांकडे नकली गिऱ्हाईक पाठविले. मात्र हे गिऱ्हाईक नसून पोलीस असल्याचे लक्षात येताच या रक्तचंदन विक्रेत्यांनी आपल्या वॅगनार मारुती कार (एमएच-०३,बीसी-३५९८) मधून पळ काढला. त्यावेळी माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक सतीष अस्वर, हवालदार पोळेकर, कॉन्स्टेबल शाम शिंदे, शाम डोईफोडे, अमोल पोंदे, गोविंद तलवारे, दिपाली मोरे यांनी पाठलाग करीत इंदापूर बाजारपेठेत नागरिकांच्या मदतीने वॅगनार मारुती कार अडवून तिघाजणांना पकडले. व कारमधील ४० किलो रक्तचंदन सदृश्य माल ताब्यात घेतला.

**कारचा पाठलाग करून तीन आरोपींना पकडले**

सुनील प्रेमचंद पटवा (वय २४), शारीक खान (वय २५) आणि इम्रान शेख (वय २३, सर्व रा. मुंबई) अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या इसमांची नाव असून, या तिघांची सायंकाळी उशिरापर्यंत चौकशी चालू होती.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, हे रक्तचंदन कुठून आले ? याची सखोल चौकशी वनविभाग करीत आहे.

# फूडमॉलमधील कर्मचाऱ्यांची खासगी बसवर दगडफेक

## द्रुतगती मार्गावर सावरोली टोलनाक्याजवळ घटना; १० प्रवासी जखमी



**खालापूर : प्रतिनिधी**

द्रुतगती मार्गावरील सावरोली टोलनाक्यावर थांबलेल्या एका खासगी बसवर रविवारी (दि. ९) रात्री फूडमॉलमधील कर्मचाऱ्यांनी दगडफेक करून प्रवाशांना मारहाण केली. या घटनेत १० प्रवासी जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

वर्सोवा मुंबई येथील ३० जणांचा ग्रुप रविवारी विशाल टुर या खाजगी कंपनीच्या बसने कार्ला येथे गेला होता. एकविरा मातेचे दर्शन घेऊन मुंबईस परतत असताना द्रुतगती महामार्गावरील फुडमॉल येथे रात्री १० वाजण्याच्या सुमारास जेवण करताना फूडमॉलमधील कर्मचारी व प्रवासी यांच्यामध्ये किरकोळ कारणावरून हमरीतुमरी झाली. त्याचा राग धरून फुडमालचा व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी सावरोली (खालापूर) टोलनाक्यावर थांबलेल्या या खासगी बसवर दगडफेक करीत प्रवाशांना मारहाण केली. यामध्ये १० जण जखमी झाले असून त्यांना चिंचवड येथील लोकमान्य रुग्णालय व काहींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलीस ठाण्याचे हवालदार संतोष रुपनवर व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले. व दगडफेकीत नुकसान झालेली बस ताब्यात घेऊन पंचनामा केला.

या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या परस्परविरोधी तक्रारींवरुन फूडमॉल व्यवस्थापक निलेश लाटे व अन्य ९ तसेच प्रवासीमधील किरणेश्वर चोका (रा. वर्सोवा मुंबई) व अन्य १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# बोरघाटात कार डिव्हायडरला ठोकली

## एक ठार, एक गंभीर जखमी



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून मुंबईकडे चाललेल्या कार (एमएच-०२,एव्ही-६२९)ने सोमवारी (दि. १०) सायंकाळी बोरघाटातील अमृतांजन ब्रिज पोलीस चौकीजवळ रस्ता दुभाजकाला धडक दिली. या अपघातात कारमधील एक प्रवासी ठार तर एक प्रवासी गंभीर जखमी झाला. त्याला लोणावळा येथील पवना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने सोमवारी संध्याकाळी पुण्याकडून मुंबईकडे चाललेल्या कारने बोरघाटातील अमृतांजन ब्रिज पोलीस चौकीजवळ रस्ता दुभाजकाला जोरदार धडक दिली.

या वेळी कारमध्ये दोन जण होते. ते दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना आयआरबी ॲम्बुलन्सने लोणावळा येथील पवना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र त्यापैकी संगीत एस. याचा रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या जखमीचे नाव समजू शकले नाही. या अपघातानंतर द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.

क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त कार बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक बोरघाट योगेश भोसले पुढील तपास करीत आहेत

# जिल्ह्यात ३० ऑक्टोबरपर्यंत प्लास्टिक संकलन मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गावागावात ३० ऑक्टोबरपर्यंत प्लास्टिक संकलन मोहीम राबविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व गटविकास अधिकाऱ्यांना केल्या आहेत. तसेच जमा करण्यात आलेले प्लास्टिक पुनर्प्रक्रियेसाठी देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन हा प्रश्न मोठ्या प्रमाणात सर्वत्र निर्माण झाला आहे. प्लास्टिक कचऱ्याचे वातावरणात लवकर विघटन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा ठिकठिकाणी जमा झाला आहे. त्यामुळे स्वच्छ भारत मिशन ग्रामीण २ अंतर्गत गावस्तरावर प्लास्टिक संकलन मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

रायगड जिल्हा परिषदेमार्फत ३० ऑक्टोबरपर्यंत प्लास्टिक संकलन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत नेहरू युवा केंद्राचे विशेष सहकार्य लाभणार आहे. यासह जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, बचत गट, विद्यार्थी सहभागी होणार असून, प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर प्लास्टिक संकलन मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत नागरिक, व्यापारी, दुकानदार, गृहनिर्माण सोसायट्या यांना दवंडी, घंटागाडी, उद्घोषणाद्वारे दररोज प्लास्टिक कचरा स्वतंत्र गोळा करून देण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. तसेच कचरा व इ-वेस्ट संकलन मोहिमेसाठी स्वयंसेवक व ग्रा.पं. कर्मचारी यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. जमा करण्यात आलेले प्लास्टिक स्थानिक व्हेंडर भंगारवाले अथवा एजन्सीद्वारे पुनर्प्रक्रियेसाठी देण्यात येणार आहे.

प्लास्टिक संकलन मोहिमेच्या फलनिष्पत्तीसाठी नेहरू युवा केंद्रामार्फत सहभागी संस्थांमधून चांगले काम केलेल्या तीन संस्था व युवकांचा तसेच ग्रामपंचायतीचा सन्मान करून त्यांना नेहरू युवा केंद्र प्लास्टिक योद्धा म्हणून गौरव करणार आहे.

# अज्ञात कारणावरून तरुणाची आत्महत्या

**खालापूर : प्रतिनिधी**

अज्ञात कारणावरून समीर किशोर पाटील (वय २२, रा. तारा, ता. पनवेल) या तरुणाने नदीपात्रात उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कालिवली गावाजवळ दुचाकी व त्यासोबत काही वस्तू आणि विषस्वरुप रसायन असलेली मोकळी बाटली आढळली, मात्र त्या ठिकाणी संबंधित दुचाकीधारक आढळून आला नसल्याने पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी खोपोली येथील अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या पथकाला पाचारण केले. या पथकाने घटनास्थळाजवळील नदीपात्रात शोध घेत समीर पाटील याचा मृतदेह बाहेर काढला व शवविच्छेदनासाठी चौक ग्रामीण रुग्णालयात पाठविला.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहिर ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/२३२२/प्र.क्र.०१/२६६३/२०२२ दिनांक : १०/१०/२०२२

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government / State Government/Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार जाहिर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/१०२/२०२२-२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रॉ.क्र.१०३३-अ मधील समाज मंदिराचे उर्वरित कामे करणे. | ४७,३८,३९५/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.११/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ.प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**


# सुरगड, मानगडावर दुर्गोत्सव

## दुर्गवीर प्रतिष्ठानचा उपक्रम





**पाली : प्रतिनिधी**

'आधी तोरण गडाला मग माझ्या घराला' या संकल्पनेतून दुर्गवीर प्रतिष्ठानच्या वतीने मानगड व मुंबई-गोवा महामार्गावरील खांब गावाजवळील सुरगड किल्ल्यावर विजयोदुर्गोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गडावर गडपूजन, शिवपूजन, गडदेवतेचे पूजन, ध्वजपूजन व शस्त्रपूजन करण्यात आले. झेंडूच्या फुलांची तोरणे, पताका यांच्या सहाय्याने गडाचे प्रवेशद्वार व गुप्त दरवाजा वास्तुंची सजावट करण्यात आली. यावेळी गावकरी व चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

मानगडावर प्रवेशद्वार, बुरुज, इंजाई देवी मंदिर परिसर, शिवपिंडी, ध्वजस्तंभ, गुप्त दरवाजा इत्यादि वास्तुंची या वेळी साफसफाई करण्यात आली. त्यानंतर गडाला पताके, तोरणं, ध्वज व महिलांनी रांगोळ्यांची आरास करून गड सजवला. गडाच्या महाद्वारावर गडपूजन करून, शिवपिंडीचे पूजन, ध्वजपूजन, शस्त्रपूजन आणि महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून आरती, गारद देण्यात आली. यावेळी बालदुर्गवीर गार्गी डिंगणकर हिने ध्येय्य मंत्र घेऊन व शौर्य हासुरकर यांने शिवछत्रपतींचा जयजयकार करुन उपस्थित दुर्गवीरांच्या अंगात एक ऊर्जा निर्माण केली. या कार्यक्रमास इतिहास संकलक रामजी कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सुरज जोरकर व साहिल दबडे यांनी या कार्यक्रमाचे चित्रीकरण केले.

मानगड किल्ल्यावर विजयोदुर्गोत्सव साजरा करण्यासाठी एकूण २५ दुर्गवीर सदस्यांनी सहभाग घेतला. मोहीम प्रमुख प्रशांत डिंगणकर, अल्पेश पाटील, प्रमोद डोंगरे, प्रतिक पाटेकर, सहभागी सदस्य प्राजक्ता पाटील, प्रांजल डिंगणकर, गीतांजली लोकेगावकर, कल्पना निवाते, आकाश कोराटे, उज्वला कोराटे, विशाल बामणे, भावेश कदम, जयेश भद्रिके, आकाश ठाकूर, प्रणिता उत्तेकर,संस्कृती हसुरकर, अनिकेत सावंत, मनीषा निगडे, वृषाली निवळे, गार्गी डिंगणकर, अहिल्या हासुरकर, शौर्य हासुरकर, रूद्र कदम, लक्ष्मिका निवाते व गौरी खरात सहभागी होते.

सुरगडावर गावातील जोडप्यांना गडपूजनाचा मान दिला गेला. गडाला तोरण बांधण्यासाठी, गडपूजन करण्यासाठी गावकरी तसेच दुर्गवीर प्रतिष्ठान संस्था, शिवशंभू प्रतिष्ठान (रोहा) यांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. गडदेवतेचे म्हणजेच अनसाई देवीच्या मंदिरात सर्वांनी पूजाविधी केला. देवीची आरती करून सर्वांनी गडाचा माथा गाठला. महादरवाजामध्ये गडपूजनाचा कार्यक्रम झाला. या मोहिमेत दुर्गवीर सदस्य महेश सावंत, विशाल इंगळे, किशोर सावरकर, जितेंद्र पार्टे, सुरेखा पार्टे, किशोरी सावरकर व शिवशंभू प्रतिष्ठानचे नरेंद्र महाडिक, मनिषा महाडिक, अस्मित महाडिक, श्रीकांत जंगम यांच्यासह ५० शिवप्रेमींचा सहभाग होता.

**दुर्गवीर प्रतिष्ठान ही संस्था गेली १४ वर्ष सातत्याने आपले सण उत्सव गडावर मोठ्या उत्साहात साजरे करत आहे. गडसंवर्धन हा विषय गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावागावात पोहोचावा, स्थानिक गावकरी वर्ग संवर्धनासाठी तयार व्हावे यासाठीचा प्रयत्न संस्था करत आली आहे.**

**-विशाल सरदेशमुख इंगळे, सदस्य, दुर्गवीर प्रतिष्ठान**


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ४२ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार/सु.बे.अ. यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. नु. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाड येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती करणे. तालुका जिल्हा रायगड. (एस आर) | १७६१४१९ | १८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| २ | माणगांव न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (एस आर) | १७७७८२७ | सु.बे.अ. | ५९०/- | ६ महिने | सु.बे.अ. |
| ३ | विन्हेरे बागआळीण तालुका महाड येथे रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (खा.स्था.वि.) | १३३१४८६ | सु.बे.अ. | ५९०/- | ३ महिने | सु.बे.अ. |
| ४ | ग्रा.पं. निजामपूर ता. माणगांव, येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि.) | १७८११४४ | सु.बे.अ. | ५९०/- | ६ महिने | सु.बे.अ. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०७/१०/२०२२** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२१/१०/२०२२** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २५/१०/२०२२ वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४२५७
दिनांक : ०३/१०/२०२२

**विमाका/कोवि/२०२२-२०२३/१३८**

**सही/-**
**(एम.आर.नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# परतीच्या पावसाने भाज्यांचेही नुकसान

## बाजारात उच्चांकी दर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सध्या बाजारात भाजीपाला परत एकदा चांगला महाग होत चालला आहे. नवी मुंबई, मुंबईसह राज्यांमध्ये परतीच्या पावसामुळे भाज्यांचे भाव वाढले आहेत. फ्लॉवर ८० रुपये, वांगी ४५ रुपये किलो, टोमॅटो ५४ रुपये किलो, तर किरकोळ विक्रेते बटाटा २५ ते ३० रुपये किलो, फ्लॉवर १०० रुपये किलो दराने विकत आहेत. सध्या बाजारात भाजीपाला परत एकदा चांगला महाग होत चालला आहे. भाज्या आणि फळांच्या वाढत्या किमतींचा परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर वाईट होत आहेत. किरकोळ विक्रेत्यांचा दावा आहे की, त्यांनाही जास्त दराने माल मिळत आहे. बटाटा २५ ते ३० रुपये किलो, फ्लॉवर ८० रुपये, वांगी ४५ रुपये किलो, टोमॅटो ५४ रुपये किलो, तर किरकोळ विक्रेते बटाटे २५ ते ३० रुपये किलो, फ्लॉवर १०० रुपये किलो, वांगी ८० रुपये किलो, दराने विकली जात आहेत. टोमॅटो ५० रुपये किलो दराने विकले जात आहेत. एका भाजी विक्रेत्यांनी सांगितले की, परतीच्या पावसामुळे मालाचे नुकसान होत आहे. त्यामुळे पुरवठा होत नसल्याने आणि वाहतूक खर्च जास्त असल्याने भाजीपाला आणि फळांचे भाव चढे असल्याचे त्यांचे मत आहे. पावसामुळे शेतातील भाजीपाला सडला आहे. बाजारात त्याची टंचाई असल्याने त्याचे दरही वाढले आहेत.

राज्यात परतीचा पाऊस लांबल्यामुळे टोमॅटो, सिमला मिरची, मटार, सोयाबीन, काकडी आणि कोबी या पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. एकूण उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. दिवाळीनंतर भाव सामान्य होतील, असे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे.

## घाऊक बाजारात कांदा वधारला



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न कांदा बटाटा बाजार समितीत गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर स्थिर होते, परंतु सोमवारी (दि. १०) घाऊक बाजारात कांदा वधारला आहे. प्रतिकिलो मागे दरात कमीत कमी पाच रुपये ते जास्तीत जास्त सात रुपयांनी वाढ झाली आहे. पावसामुळे साठवणुकीचे कांदे मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. तर नवीन कांद्याना ही पावसाचा फटका बसलेला आहे. त्यामुळे बाजारात उत्तम दर्जाचे कांदे कमी येत असल्याने ही दरवाढ होत असल्याचे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

नवीन लाला कांदे अद्याप बाजारात दाखल होत नसल्याने तसेच साठवणूकीचे कांदे खराब होत आहेत. त्यामुळे कांद्याच्या दराने उसळी घेतली आहे. मागील काही वर्षांपासून अवकाळी पावसाने जुन्या आणि नवीन कांद्याला झळ बसत आहे. परिणामी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये कांदा वधारत आहे. या वेळी ही मुसळधार पावसामुळे चाळीलीतील साठवणूकीचा जुना कांदा मोठ्या प्रमाणात सडलेला निघत आहे. सोमवारी बाजारात कांद्याच्या १४३ गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यापैकी ८० टक्के कांदा खराब निघत आहे, तर अवघे २० टक्के कांदा चांगला येत आहे. बाजारात उच्चतम दर्जाच्या कांद्याला जास्त मागणी आहे. त्यामुळे दरात वाढ झाली आहे, अशी माहिती व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून प्रतिकिलो १५रु ते २०रुपयांवर स्थिर असलेल्या कांद्याच्या दरात आता पाच ते सात रुपयांनी दरवाढ झाली आहे. कांद्याची दरवाढ झाल्याने गृहिणींना मात्र आर्थिक झळ बसणार आहे.

## उरण तालुक्यात पशुसंवर्धन विभागामार्फत लसीकरण



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

गोधनाच्या जीवावर उठलेल्या लम्पी आजाराबाबत रायगड जिल्ह्याचा पशुसंवर्धन विभाग सतर्क झाला आहे. जिल्ह्यातील गुरांच्या संरक्षणासाठी लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. उरण तालुक्यात येणाऱ्या गाव आणि वाड्या वस्त्यांवरील गोवर्ग जनावरांना पशु विभागामार्फत लसीकरण करण्यात येत आहे.

दरम्यान, तालुक्यात झालेल्या संरक्षणात अजून तरी एकही लम्पी चर्मरोगाने बाधित जनावरे आढळून आली नाहीत, तरीही खबरदारीची उपाययोजना म्हणून मोठ्या संख्येने जनावरे असलेल्या गावात पशुसंवर्धन विभागाकडून लसीकरण मोहीम सुरू केली असल्याचे, उरणचे पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिल धांडे यांनी स्पष्ट केले आहे. तालुक्यात सद्यस्थितीत शासनाकडून मिळालेल्या लसी पैकी मार्गदर्शक सूचनेनुसार जवळजवळ शंभर टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे. यात रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या गोवर्ग जनावरांनाही लम्पी चर्म रोगाची लस देण्यात आली आहे.

दरम्यान, तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून डॉ. रासडी डाबेराव यांनी चिरनेर परिसरातील ११६१ गोवर्ग जनावरांचे लसीकरण केले. तर डॉ. महेश शिंदे यांनी विंधणे परिसरात २९७ गोवर्ग जनावरांना लम्पी चर्म रोगाची लस दिली तसेच जासई येथील डॉ. महेश सावंत यांनी ५४२ गुरांचे लसीकरण केले. उरण येथील डॉ. सोमनाथ भोडान यांनी ९५४ गोवर्ग जनावरांचे लसीकरण केले आहे, असे एकूण तालुक्यात २ हजार ९५४ गोवर्ग जनावरांना त्यांच्या संरक्षणासाठी लम्पी चर्मरोगाच्या आजाराची लस देण्यात आली आहे. त्यामुळे येथील गाई, म्हैशी, बैल या पाळीव पशू मालकांनी लम्पी रोगापासून गुरांना वाचविण्याचा निश्वास सोडला आहे.





पनवेल : भाजपचे बोर्ले बूथ अध्यक्ष संतोष बुवा पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, युवा नेते योगेश लहाने, अनेश ढवळे, शांताराम चौधरी आदी उपस्थित होते.

## नवी मुंबईत संविधान जागृती अभियानाची तयारी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत संविधान जनजागृती अभियान रबवण्यात येणार आहे. सीबीडी बेलापूर येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात नवी मुंबईतील विविध सामाजिक, संस्था व कार्यकर्ते यासाठी सरसावले आहेत. संविधान जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी एकत्र येवून येत्या संविधान दिनापर्यंत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे आहे. त्या संबधीची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी (दि. ९) झाली. पी. ई. एस. शिक्षण संस्थेचे प्रा. भास्कर पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस नवी मुंबईतील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत संविधान मित्र, लोटस संस्था व महिला बचत गट, अखिल भारतीय नाथपंथी समाज, नुतन एकता मंडळ व महिला बचत गट, सीबीडी पोलिस व महिला बॉईज संघ मूलनिवासी संघ, लातूर परिवार,जागृत भारतीय संघ आणि संविधान जागृती शिक्षक मंच इ. नवी मुंबईतील संस्था व संघटनांचे प्रतिनिधी बैठकीत सहभागी झाले होते. संविधान दिन उत्साहात साजरा करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.

## लोकशाही दिनी चार अर्ज निकाली

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या सात असून आलेल्या अर्जांची संख्या निरंक असे एकूण प्राप्त अर्ज सात होते. त्यापैकी चार अर्ज निकाली काढण्यात आले. तीन तक्रारी प्रलंबित आहेत.

## पनवेलमध्ये राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात सोमवारी (दि. १०) राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचे उद्घाटन आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात वैद्यकिय आरोग्य विभागाच्या प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांच्या हस्ते करण्यात आले. या मोहिमेंतर्गत पालिका क्षेत्रातील सर्व शाळा-महाविद्यालयातील १ ते १९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले.



या मोहिमेंतर्गत सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप केले. या अंतर्गत सर्व शासकीय शाळा, शासकिय अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महापालिका शाळा, अंगणवाड्या, सर्व कनिष्ठ विद्यालये, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी अशा एकुण एक लाख नऊ हजार ५९५ लाभार्थ्यांना जंत नाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. आज जे विद्यार्थी, बालके जंतनाशक गोळ्यापासून वंचित राहीले आहेत त्यांना दिनांक १७ ऑक्टोबरला पुन्हा एकदा जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

## उरण ते शिर्डी पदयात्रेला प्रारंभ

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळ उरण तर्फे उरण ते शिर्डी पायी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले असून रविवारी (दि. ९) श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट नागाव अंबिकावाडी उरण येथून शिर्डीला जाण्यासाठी पदयात्री रवाना झाले आहेत.



पदयात्रा ९ ते १७ ऑक्टोबर या दरम्यान असून १७ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वा पदयात्री शिर्डीत पोहचणार आहेत. पहाटे ४ वाजता श्रीच्या चरण पादुका, पालखी पूजा काकड आरती, पुढील प्रस्थान, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती व साईचरित्र अध्याय पारायण, दुपारी ३ वा. ॐ श्री साईनाथाय नमः मंत्राचा जप व पुढील प्रस्थान, सायंकाळी ६:३० वाजता धूप आरती, ६.३० ते ८ भजन किर्तन भारूड प्रवचन असे या पदयात्रेतील दिनचर्याचे स्वरूप आहे. पदयात्री श्री साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर घरी उरणला परतल्यानंतर गुरुवारी (दि. २०) सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत श्री साई सत्य नारायणाची महापूजा साई मंदिर नागाव येथे ठेवण्यात आले आहे. या वेळी श्री साई भंडारा (महा प्रसादाचेही) आयोजन करण्यात आले आहे. भाविक भक्तांनी या साई भंडाराचा लाभ घ्यावा असे आवाहन ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळ उरण तर्फे करण्यात आले आहे.

ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळ उरणची स्थापना २००० साली झाली असून उरण ते शिर्डी पदयात्रेचे यंदाचे २२ वे वर्ष आहे. सर्व जाती धर्माचे लोक आनंदाने या पदयात्रेत सामील होतात. पदयात्री श्री साईबाबांचे नामस्मरण करत शिर्डीला पोहचतात. ही पदयात्रा व सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॐ श्री साईराम पदयात्रा मंडळाचे सर्व संचालक, मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्य, सर्व साई भक्त, पदयात्री, ग्रामस्थ विशेष मेहनत घेत आहेत.

## सरकारी नोकरीविषयी मार्गदर्शन शिबिर

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण पूर्व विभागातील तरुणांसाठी श्रीया फाऊंडेशन पाले व कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) व शिक्षा अकॅडमी बोकडवीरा यांच्या वतीने रविवारी (दि. ९) सरकारी नोकरी, पोलीस भरती आणि सरळ सेवा भरती पूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.




या वेळी आठ देशामध्ये भारताचे अँथलेटिक्समध्ये प्रतिनिधित्व केलेले, एन आय एस अथलेटिक्स कोच व शिक्षा ट्रेनिंग अकॅडमीचे संस्थापक प्रशांत पाटील, निवृत्त पोलीस सबइन्स्पेक्टर चंद्रकांत म्हात्रे, निवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोसुराम म्हात्रे आणि श्रीकांत म्हात्रे, श्रीया फाऊंडेशन पाले अध्यक्षा स्मिता म्हात्रे, प्रसिद्ध निवेदक व क्रिकेट समालोचक सुनील वर्तक, आगरी कोळी कराडी उद्योजक असोसिएशनचे राहुल ठाकूर, दिपिका ठाकूर, संदीप म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी संस्थेच्या अध्यक्षा स्मिता म्हात्रे यांनी सांगितले की, आमचा पूर्व विभाग सुशिक्षित आहे परंतु शिक्षण क्षमता असून सुद्धा गोडाऊनच्या खाजगी नोकरी मध्ये अडकला आहे. दहावीवाला पण तीच नोकरी करतो जो ग्रॅज्युएशन एम.ए. झालेला करतो कारण काय तर रोजची कमाई आणि घराजवळ नोकरी. तरुणांनी विचार बदलला तर परिस्थिती निश्चित बदलेल असा आशावाद त्यांनी केला. तर प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय धावपटू व ऍथलेटिक्स कोच श्री प्रशांत पाटील यांनी सरकारी नोकरी, पोलीस भरती व सरळसेवा भरती याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या विभागात तरुण सरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी स्थानिक प्रकल्पात अधिकारी का होत नाहीत त्यासाठी शिक्षा फाऊंडेशनतर्फे निश्चित प्रयत्न मार्गदर्शन केले जाईल असे ते म्हणाले. तर पोलीस भरती वेळी आपल्याकडे कोणते कौशल्य पाहिजे शारीरिक क्षमता कशी पाहिजे याबाबत सखोल मार्गदर्शन प्रात्यक्षिकासहित श्रीकांत म्हात्रे यांनी केले. या वेळी पोलीस सबइन्स्पेक्टर चंद्रकांत म्हात्रे व सहा पोलीस उपनिरीक्षक पोसुराम म्हात्रे यांनी उपस्थित तरुण व पालकांना जास्तीत जास्त सरकारी नोकरी व पोलीस भरती साठी प्रयत्न करावे, तर सुनील वर्तक व संदीप म्हात्रे यांनीसुद्धा उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलींद म्हात्रे व दिपिका ठाकूर, किरण परमार यांनी केले व कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन रमाकांत म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे, विनोद म्हात्रे, राजेश म्हात्रे, प्रितम म्हात्रे, अक्षय म्हात्रे यांनी केले.

# कान्होजी आंग्रेंचा समुद्री चाचे उल्लेख केल्याने शिवभक्त संतापले

**अलिबाग : प्रतिनिधी**

गुगल आणि विकिपीडियावर सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांचा समुद्री चाचे असा उल्लेख केल्याने शिवभक्त संतापले आहेत. याबाबत आक्षेप नोंदवल्यानंतर विकिपीडियावर दुरुस्ती करण्यात आली आहे.

गुगल आणि विकिपीडिया हे दैनंदिन माहिती मिळण्याचे स्त्रोत समजले जातात. जगभरातील माहिती गोळा करण्यासाठी या दोन माध्यमांची मदत घेतली जाते, मात्र गुगलवर कान्होजी आंग्रे हा शब्द सर्च केल्यानंतर तिथे कान्होजी आंग्रे यांचा उल्लेख पायरेट्स अर्थात समुद्री चाचे असा करण्यात आल्याचे रविवारी दिसून आले. यानंतर त्याच्या समाजमाध्यमांवर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.




मराठा आरमाराचे प्रमुख म्हणून सारखेल कान्होजी राजे आंग्रे यांना ओळखले जाते. ब्रिटिश, डच, पोर्तुगीज यांची अनेक आक्रमणे त्यांनी परतावून लावली. भारतीय नौदलाकडून त्यांना मेंटोर म्हणून बघितले जाते. अशा कान्होजी राजे आंग्रे यांचा उल्लेख गुगलवर समुद्री चाचे असा केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. शिवभक्तांनी आणि इतिहासप्रेमींनी यावर आक्षेप नोंदवला असून, त्यासाठी एक मोहीम सुरू केली आहे.

### आक्षेप नोंदविण्याचे आवाहन

*गुगलवर जायचं, कान्होजी आंग्रे सर्च करायचं- त्यानंतर ओपन झालेल्या पेजवर जिथे हे ळीरींश लिहिलेलं दिसतंय त्या पुढे उजव्या कोपऱ्यात ३ : उभे डॉट्स असतील त्यावर क्लिक करुन ळपर्लीशलीं असा फीडबॅक नोंदवा असे आवाहन शिवभक्तांनी केले आहे*

**हिंदवी स्वराज्याच्या नौदलाचा प्रमुख सरखेल, अठरा किल्ले आणि सलाना दोन कोटी महसूल आलेल्या भू भागाचा कर्तुम अकर्तुम अधिपती. किमान अडीचशे गलबते, गुराब, मचवे, फ्रिगेटचे दल बाळगणारा सेनानायक. ज्याच्या शिक्क्याच्या दस्तकाशिवाय इंग्रज-पोर्तुगीज आदी पश्चिमी सत्तांचे एकही जहाज पश्चिम सागर भ्रमण करु शकत नव्हते, असा सागराधिपती. ज्याने एकहाती इंग्रज आणि पोर्तगीज यांचा सागरी उन्माद उधळून लावत मराठा जरीपटक्याचा दरारा सागरावर प्रस्थापित केला, अशा विराचे पायरट हे वर्णन समस्त भारतवासीयांच्या करीता अपमानास्पद आहे. यावर आक्षेप नोंदवणे गरजेचे आहे.**

**-रघुजीराजे आंग्रे, कान्होजी राजे आंग्रे यांचे वंशज**

# पाली बाजारपेठ अवैध पार्किंगच्या विळख्यात

## नागरिक हैराण; नगरपंचायत, पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष



**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहरातील बाजारपेठ वाहतूक कोंडी आणि अवैध पार्किंगच्या विळख्यात सापडल्याचे चित्र नेहमी दिसते. पाली हे अष्टविनायकांपैकी एक क्षेत्र आहे. त्यामुळे भाविक आणि पर्यटकांची येथे नेहमीच वर्दळ असते. मात्र गणपतीचे देवस्थान व्यतिरिक्त या शहरात अन्य पार्किंगची व्यवस्था नसल्याने जागा मिळेल तेथे वाहने उभी केली जातात. या बेशिस्त पार्किंगमुळे बाजारपेठेत जागोजागी वाहतूक कोंडी होत आहे.

पाली शहरातील हाटाळेश्वर चौक, बाजार पेठ येथील वाहतुकीचा प्रश्न नेहमीच वादग्रस्त राहिला आहे. या परिसरात होणाऱ्या अवैध पार्किंगमुळे पादचारी तसेच दुकांनदार त्रस्त झाले असून, काहीवेळा दुकांनदारमध्ये भांडणही होत असतात. विशेषत: दुचाकींच्या अवैध पार्किंगमुळे पालीमध्ये वाहतूक कोंडी होत असते. म. गांधी चौक ते बाजारतळे (हटाळेश्वर चौक) या रस्त्यावर सर्वात वाहतुक कोंडी होते. या रस्त्यांवर अनेक दुचाकी उभ्या असल्याने नागरिकांना तेथून मार्ग काढताना सर्कस करावी लागते.

म. गांधी चौक ते बाजार तळे या पाली बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर होणाऱ्या अवैध पार्किंगवर कारवाई कोण कारणार? पाली नगरपंचायत की, पोलीस प्रशासन? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला आहे.

# भाजप जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर





**खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष व कोयना प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे नेते, माजी सरपंच विठ्ठल मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (दि. १०) वडवळ (ता. खालापूर) येथे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ९० जणांनी आरोग्य तपासणी करून घेतली.

रायगड रुग्णालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी शिबिरार्थींची आरोग्य तपासणी केली. दरम्यान, विठ्ठल मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी माजी आमदार देवेंद्र साटम व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# माथेरानमध्ये वाल्मिकी जयंती उत्साहात

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमध्ये 'रामायण'कार महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नगर परिषद सभागृहात मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे (शिंदे) यांनी संत वाल्मिकी ऋषींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

नगर परिषदेचे कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे, लेखापाल अंकुश इचके तसेच ज्ञानेश्वर सदगीर, अभिमन्यू येळवंडे, अन्सार महापुळे, राजेश रांजाणे, स्नेहा साखळकर, नम्रता गोरे, उमेश मोरे, लक्ष्मण दरवडा, जयवंत वर्तक, स्वागत बिरंबोले, अर्चना ढेबे, प्राजक्ता कदम, सोनाली कदम, संतोष लखन, निलेश चव्हाण, रामचंद्र चव्हाण, शोभना चव्हाण, नरेश पुरबिया यांच्यासह कर्मचारी या वेळी उपस्थित होते.





# एसआरटी पद्धतीचे तंत्रज्ञान भातशेतीला ठरतेय फायदेशीर



**कर्जत : प्रतिनिधी**

कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांनी शेतकऱ्यांचे श्रम कमी करण्यासाठी सगुणा राईस टेक्निक म्हणजे एसआरटी ही पद्धती शोधून काढली. या शेती पद्धतीमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा हातभार मिळाला आहे. अन्य जिल्ह्यांमध्येही आता एसआरटी पद्धतीने शेती केली जात आहे. यामुळे शेतकरी भातशेतीसह अन्य दोन पिके वर्षभरात घेऊ लागले आहेत. हे तंत्रज्ञान फायदेशीर ठरतेय असे अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

अनेक वर्षे शेखर भडसावळे आणि त्यांचे सहकारी भाताच्या नवीन जाती विकसित करण्यात आघाडीवर आहेत. जास्त उत्पादन देणाऱ्या भाताच्या अनेक जाती सगुणा बागेने विकसित केल्या आहेत. त्या प्रत्येक वेळी शेतात वर्षातून दोनदा पिके घेण्यासाठी ते ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करायचे. त्याचवेळी मजूर शोधून लावणी तसेच मशागत करावी लागत असल्याने भडसावळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन काही तर उपाय शोधले पाहिजेत याची वारंवार चर्चा केली. त्यातून एसआरटी पद्धती जन्माला आली.

एसआरटी म्हणजे नांगरणी न करता शेतात पिके घेण्याची पद्धत. सगुणा रूरल फाउंडेशनच्या माध्यमातून एक लोखंडी अवजार विकसित करण्यात आले आहे. त्याच्या सहाय्याने एकदा वाफे पाडल्यानंतर पुन्हा चार-पाच वर्षे कोणतेही नवीन वाफे पाडण्याची गरज लागत नाहीत. त्याचवेळी वेळेवर कीटकनाशकांची फवारणी, पाण्याचे नियोजन केल्यास वर्षातून किमान तीन पिके घेता येणे या पद्धतीत सहज शक्य होते. प्रामुख्याने कमी पावसाच्या भागातदेखील ही एसआरटी पद्धत फायदेशीर ठरली आहे.

एसआरटी पद्धतीला शासनाच्या यादीत समाविष्ट केले गेल्याने कर्जत तालुक्यात हे तंत्र विकसित झाल्यानंतर त्याचा या भागातील शेतकऱ्यांनी स्वीकार केला आणि रायगड जिल्ह्यात किमान एक हजार शेतकरी एसआरटी पद्धतीने भाताची शेती करीत असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एसआरटीने भातशेती केली जात आहे. त्यात वर्षातून तीन पिके घेता येणे शक्य असल्याने शेतकऱ्यांनी या पद्धतीला आपलेसे केले आहे. राज्यातील किमान १० हजार शेतकरी एसआरटी पद्धतीने भाताची तसेच भुईमूग आणि अन्य प्रकारची शेती करीत आहेत.

अशी आहे एसआरटी पद्धत

शेत जमिनीत पिकांचे उत्पादन वाढावे म्हणून शेतकरी मोठ्या प्रमाणात रासायनिक खते यांचा वापर करीत असतात. त्यामुळे शेतातील सेंद्रीय कर्बचे प्रमाण प्रचंड खाली आल्याचे दिसून येत आहे. यावर एसआरटी शेती महत्त्वाची ठरत आहे, कारण या पद्धतीमध्ये केवळ सेंद्रिय खते वापरली जात असतात. दुसरीकडे या नव्या तंत्रज्ञानमुळे एका वर्षात किमान तीन पिके घेण्याचे नियोजन करता येते. सगुणाबागेत एका वर्षाच्या हंगामात भात, कांदा, मुग, भुईमुग, भेंडी, अशी पीके घेतली जात आहेत.

# नेरळ येथील शिबिरात ३३ रुग्णांची नेत्रचिकित्सा

**कर्जत : प्रतिनिधी**



भारतीय जनता पक्ष नेरळ मंडळ आणि शंकरा आय हॉस्पिटल-नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळमध्ये नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३३ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर मोतीबिंदू आढळलेल्या सात रुग्णांवर नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

भाजप कार्यकर्ते नितीन कांदळगावकर यांच्या नेरळ चिंचआळी येथील कार्यालयात नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. भाजपचे नेरळ शहर अध्यक्ष संदीप म्हसकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. त्यावेळी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिनेश पेटकर, भाजप महिला मोर्चा नेरळ शहर अध्यक्षा नम्रता कांदळगावर, भाजप नेरळ शहर माजी अध्यक्ष अनिल जैन, नेरळ ग्रामपंचायत सदस्या श्रद्धा कराळे यांच्यासह विमल व्यास, केवल दहिवलीकर आदी उपस्थित होते. या शिबिरात नेरळ गाव आणि परिसरातील ३३ रुग्णांची नेत्र चिकित्सा करण्यात आली. सात रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. त्यासाठी त्यांना नेरळ येथून नवीन पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मोतीबिंदू शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्या सर्वांना पुन्हा नेरळ येथे आणून सोडले जाणार असल्याची माहिती आयोजकांच्याकडून देण्यात आली.

# कर्जत इनरव्हील क्लबकडून अंगणवाड्यांना मदतीचा हात

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील इनरव्हील क्लबने कर्जत तालुक्यातील दोन अंगणवाड्यांना मदतीचा हात दिला आहे.

कर्जत तालुक्यातील मालवाडी व किरवली येथील अंगणवाड्यांत प्रत्येकी २५ ते ३० मुले आहेत. इनरव्हील क्लब ऑफ कर्जत या संस्थेच्या सेक्रेटरी मोनिका बडेकर यांनी या अंगणवाड्यांना ५० हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेचे फर्निचर व शालेय वस्तू भेट दिल्या. या वेळी मुलांना खाऊचे वाटपही करण्यात आले. क्लबच्या अध्यक्षा उत्तरा वैद्य, सेक्रेटरी मोनिका बडेकर, आयएसओ प्राची चौडीए तसेच मधुरा मुळे, साक्षी अडसूळे आदी सदस्या उपस्थित होत्या.



# काव्यमैफलीतून उलगडला स्वा. सावरकरांचा जीवनपट

## कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'संस्कार भारती'चा उपक्रम



**अलिबाग : प्रतिनिधी**

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त संस्कार भारती उत्तर रायगड समितीतर्फे अलिबाग येथे 'हे मातृभूमी तुजला' ही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या गीतांवर आधारीत मैफिल आयोजीत करण्यात आली होती. इतिहास अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी आपल्या ओघवत्या शैलीतून सावरकरांनी लिहिलेली गाणी, कविता यांचा भावार्थ समजावून सांगितला. बावस्करांच्या निवेदनातून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनाचा पट केवळ उलगडत नव्हता तर डोळ्यासमोरून जात होता.

मुग्धा वैशंपायन आणि प्रणय पवार यांनी आपल्या सुरेल आवाजात ती गाणी सादर करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा..., जयोस्तुते श्री महन्मंगले ..., ने मजसी ने परत मातृभूमीला ..., शतजन्म शोधिताना... अशा एकाहून एक रचना त्यांनी सादर केल्या. त्यांना प्रमोद दवे, केदार भगत आणि समीर कर्वे यांनी साथ दिली. प्रत्येक गाण्यातून सावरकरांचे एक वेगळं रूप अनुभवायला मिळाले. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

पार्थ बावस्कर यांचे निवेदन कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. त्यांनी सावरकर यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आपल्या खास शैलीतून मांडत डोळ्यासमोर उभे केले. सावरकरांचे बालपण, त्यांचे शैक्षणिक जीवन, वैवाहीक जीवन, त्यांचे कौटुंबिक जीवन, कुटुंबातील व्यक्तींशी असलेले आणि त्यांनी जपलेले नातेसंबंध, सावरकरांची काव्य प्रतिभा, त्यांना झालेली काळ्या पाण्याची शिक्षा, फ्रान्सच्या समुद्रात मारलेली उडी, स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान अशा अनेक विषयांना स्पर्श करताना ते सारे सविस्तर उलगडून सांगितले. त्यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. त्याला रसिकांनी भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमाला अलिबागकरांनी गर्दी केली होती. सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे, भैरवी आंग्रे, आदर्श पतसंस्थेचे सुरेश पाटील, अभिजीत राणे, हेमंत दांडेकर, प्रा. उदय जोशी, प्रदीप नाईक, अभिजित राणे, ॲड. सचिन जोशी , ॲड. जयंत चेऊलकर, ॲड. श्रीराम ठोसर, डॉ. विशाखा मोडक, ॲड. अमित चव्हाण आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# भारत-आफ्रिका आज निर्णायक लढत




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय मालिकेत भारताने दक्षिण आफ्रिकेवर तब्बल सात गडी राखून विजय मिळवला. या विजयाने मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली असून तिसरा व अंतिम सामना मंगळवारी (दि. ११) नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर होणार आहे.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या नेतृत्वाची जबाबदारी केशव महाराज सांभाळत आहे, तर भारताची धुरा शिखर धवनकडे आहे. उभय संघातील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा पराभव केला होता. त्या पराभवाचा बदला घेत भारताने दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर मात केली. रांची येथे झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेने ५० षटकांत ७ बाद २७८ अशी धावसंख्या उभारली. त्यानंतर भारताने ४५.५ षटकांतच विजयी लक्ष्य गाठताना ३ बाद २८२ धावा केल्या.

श्रेयस अय्यरने एकदिवसीय कारकीर्दीमधील सर्वोच्च खेळी करताना १११ चेंडूंत नाबाद ११३ धावांची खेळी केली. त्याच्या या खेळीत १५ चौकारांचा समावेश होता. श्रेयसने डावखुऱ्या इशान किशनच्या साथीने तिसऱ्या गड्यासाठी १६२ धावांची भागीदारी करताना भारताच्या विजयाचा मार्ग सुकर केला होता. २४ वर्षीय किशनने आपल्या फलंदाजीचे वेगवेगळे स्तर ९३ धावांच्या खेळीत दाखवले.

कर्णधार शिखर धवन (२० चेंडूंत १३) आणि शुभमन गिल (२६ चेंडूंत २८) हे दोघे लवकर बाद झाल्यावर किशनने संयमाने खेळ केला. त्यानंतर स्थिरावल्यावर किशनने दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीवर केलेले आक्रमण तेवढेच विलक्षण होते. रांचीच्या संथ खेळपट्टीवर आनरिख नॉर्किएच्या ताशी १४५ किमीच्या वेगाने येणाऱ्या चेंडूला किशनने मैदानाची सफर घडवली. त्याने फिरकीविरुद्धही फटकेबाजी केली. किशनने ८४ चेंडूंच्या खेळीत चार चौकार आणि सात षटकारांची आतषबाजी केली. श्रेयसनेही कमालीचे सातत्य दाखवताना एकदिवसीय कारकीर्दीतील दुसरे शतक झळकावले.

तत्पूर्वी, एडीन मार्करम (८९ चेंडूंत ७९) आणि रिझा हेंड्रिक्स (७६ चेंडूंत ७४) यांनी मधल्या षटकांत केलेल्या १२९ धावांच्या भागीदारीने आफ्रिकेचे २७८ धावांचे आव्हान उभे केले, मात्र मोहम्मद सिराजने आफ्रिकेच्या आक्रमणावर अंकुश ठेवला. धीम्या गतीच्या चेंडूंचा अचूक वापर करून सिराजने उत्तरार्धातील षटकांत अप्रतिम मारा केला. त्याने आक्रमक पवित्र्यात असलेल्या डेव्हिड मिलरलाही (३४ चेंडूंत नाबाद ३५) जखडून ठेवले. यामुळेच आफ्रिकेची धावसंख्या मर्यादित राहिली. आता मंगळवारी निर्णायक लढत होणार आहे.



# रायगड तायक्कांदो संघाचा राज्यस्तरीय स्पर्धेत दबदबा

**पनवेल : प्रतिनिधी**

नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय ज्युनिअर व सिनिअर तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेत रायगड तायक्कांदो संघाने दोन सुवर्ण, पाच रौप्य व सात कांस्यपदके पटकाविली. या संघातील सात खेळाडूंची राज्य शासनाच्या मिनी ऑलिम्पिकसाठी निवड झाली आहे.

विभागीय क्रीडा संकुल नाशिक पंचवटी येथे ३१वी ज्युनिअर व ३४वी सिनिअर राज्य तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगडच्या निहाल संजय भोईर याने ७८ किलो गटात आणि प्रेम विलास पाटणे याने ७३ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. विद्धेश वासकर, प्रीती पाटणे, पार्थ जाधव, जयश्री गोसावी, अनुष्का लोखंडे यांना रौप्यपदक, तर नुपूर पावगे, रोहित सिनलकर, अपूर्वा देसाई, खंतेश वास्कर, भूमी माळी, श्रीजय भगत, प्रांजल पवार यांनी कांस्यपदक मिळविले.

रायगडच्या संघास संजय भोईर व तुषार सिनलकर यांचे प्रशिक्षण लाभले, तर संघ व्यवस्थापक म्हणून दिनेश पडाया व अमोल माळी यांनी काम पाहिले. विजेत्या खेळाडूंचे अमॅच्युअर तायक्कांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष ॲड. प्रज्ञा भगत, सचिव सचिन माळी, खजिनदार रोहित सिनलकर यांनी अभिनंदन केले. आर्या इंटरप्रायजेसचे प्रदीप माळी यांनी संघास टी-शर्ट वाटप केले.

# दुबळ्या थायलंडला भारताने गुंडाळले

## महिला आशिया चषकात सोपा विजय



**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश येथे सुरू असलेल्या महिला आशिया चषक स्पर्धेत सोमवारी (दि. १०) भारताने थायलंड संघाला एकतर्फी नमविले. थायलंडचा संघ १५.१ षटकांत अवघ्या ३७ धावासंख्येवर सर्वबाद झाला. भारताने हे सोपे आव्हान सहा षटकात एक गडी गमावत थायलंडवर नऊ गडी राखून मोठा विजय मिळवला.

एकतर्फी झालेल्या या सामन्यात भारताकडून शफाली वर्मा आणि एस. मेघना यांनी फलंदाजीची सुरुवात केली. मागील सामन्याची स्टार शफाली यंदा ८ धावा करताच बाद झाली. त्यानंतर मेघना आणि पूजा वस्त्राकर यांनी संघाला विजय मिळवून दिला. मेघनाने १८ चेंडूंत तीन चौकारांच्या साहाय्याने नाबाद २० धावा केल्या, तर वस्त्राकरने १२ चेंडूंत दोन चौकार मारत नाबाद १२ धावा केल्या.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. स्नेह राणाने तो सार्थकी ठरवत चार षटकांत नऊ धावा देत तीन गडी बाद करीत धक्के देण्यास सुरुवात केली. तिला दीप्ती शर्मा आणि राजेश्वरी गायकवाड यांची योग्य साथ लाभली. त्यांनी प्रत्येकी दोन बळी टिपले. थायलंडच्या केवळ एकाच फलंदाजाला दुहेरी धावसंख्या करता आली, तर चार फलंदाजाना भोपळाही फोडता आला नाही.

# जयपूरचा पाटण्यावर विजय

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामातील सातव्या सामन्यात जयपूर पिंक पँथर्सने पाटणा पायरेट्सचा ३५-३० असा पराभव करून मोसमातील पहिला विजय नोंदविला. पाटण्याचा दोन सामन्यातील हा पहिला पराभव असून या सामन्यातून त्यांना एक गुण मिळाला आहे.




पाटण्याने ३-० अशी आघाडी घेण्यासाठी चांगली सुरुवात केली होती, ज्यात त्यांनी पहिल्याच चढाईत राहुल चौधरीलाही बाद केले. जयपूर संघाचे खाते व्ही. अजित कुमारने उघडले, पण राहुल पुन्हा एकदा पाटण्याच्या बचावासमोर टिकू शकला नाही. अखेर सामन्याच्या १३व्या मिनिटाला जयपूरने पाटण्याला प्रथमच ऑलआउट केले. अर्जुनने पहिल्या हाफमध्येच या मोसमातील पहिला सुपर १० पूर्ण केला. सामन्याच्या १६व्या मिनिटाला पटण्याच्या बचावफळीने अर्जुनला प्रथमच टॅकल केले. जयपूरच्या बचावामुळे लवकरच अर्जुनाला जीवदान मिळाले. पाटण्याला दुसऱ्यांदा ऑलआऊट करण्याची जयपूरला संधी होती, पण रोहित गुलियाने आपल्या संघाचे दोन टच पॉइंट्स वाचवले.

उत्तरार्धात २७व्या मिनिटाला जयपूरने पाटण्याला दुसऱ्यांदा ऑलआऊट केले. पाटण्याने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण भवानीने आपल्या संघाला ऑलआऊटपासून वाचवले आणि जयपूरने सामना जिंकला.

# मॅथ्यू वेडचे लाजिरवाणे कृत्य

## पराभव टाळण्यासाठी प्रतिस्पर्धी खेळाडूला धक्काबुक्की

**पर्थ : वृत्तसंस्था**



पहिल्या टी-२० सामन्यात इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा आठ धावांनी पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू वेडने जे कृत्य केले त्याबद्दल त्याच्यावर टीका होत आहे.

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज मार्क वुड ऑस्ट्रेलियाच्या डावाच्या १७व्या षटकात गोलंदाजी करीत होता. या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर फलंदाज मॅथ्यू वेडला मोठा फटका मारायचा होता, पण वेळ योग्य न जमून आल्याने चेंडू हवेत अडकला. त्याच वेळी वेडने लज्जास्पद कृत्य केले. त्याने मार्क वुडला क्रीजच्या आत जाण्याच्या नावाखाली ढकलले. त्यामुळे वुडला झेल पकडता आला नाही.

या सामन्यात मॅथ्यू वेड शेवटच्या षटकात बाद झाला आणि इंग्लंडने हा सामना आठ धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना कर्णधार जोस बटलरच्या ६८ आणि ॲलेक्स हेल्सच्या ८४ धावांच्या जोरावर इंग्लंडने २० षटकांत ६ गडी गमावून २०८ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला २०० धावाच करता आल्या.

# महाराष्ट्राचे योगा, मल्लखांबमध्ये ‘सुवर्ण’ यश कायम

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

योगासन, मल्लखांब प्रकारातील यशामुळे ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या अखेरच्या टप्प्यात महाराष्ट्राच्या सुवर्णपदकांमध्ये भर पडली. मल्लखांबमध्ये अक्षय तरळ, तर योगासनात प्रज्ञा आणि सानिकाने सुवर्णपदक मिळविले. योगासनात वैभव श्रीरामे आणि पूर्वाने रविवारी अनुक्रमे कांस्य आणि रौप्यपदकाची कमाई केली. ट्रायथलॉन, हॉकी, वुशू प्रकारातही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपली आगेकूच कायम राखली आहे.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**

योगासनात प्रज्ञा आणि सानिकाने सुवर्ण कामगिरी केली. कलात्मक प्रकारातील दुहेरीत त्यांनी हे यश मिळविले. पूर्वा आणि प्राप्ती या बहिणी रौप्यपदकाच्या मानकरी ठरल्या. योगासन प्रकारात महाराष्ट्राने आतापर्यंत तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण सहा पदके मिळविली आहेत.

ओम वरदाई आणि मनन कासलीवालने पुरुषांच्या कलात्मक दुहेरी प्रकारात ११८.४५ गुणांसह दुसरे स्थान पटकावले. याच गटात दोन सुवर्णपदकांचा मानकरी ठरलेल्या वैभव श्रीरामने शुभमच्या साथीने १७२.२ गुणांसह कांस्यपदक मिळविले. महाराष्ट्र संघाने दिवसभरामध्ये योगासनात चार पदकांची कमाई केली.

मल्लखांबमध्ये अक्षय तरळने सुवर्ण, तर शुभंकर खवलेने रौप्यपदक पटकावले. पुरलेला, टांगता आणि दोरीचा मल्लखांब अशा तीनही प्रकारांत एकत्रित सरस कामगिरी करताना अक्षयने २६.८५ गुणांसह सुवर्ण यश मिळविले. शुभंकरचे २६.७० गुण होत.

सॉफ्टबॉल प्रकारात पुरुष संघाने विजयी घोडदौड कायम राखत गटात अव्वल स्थान मिळविले. महाराष्ट्राने पहिल्या सामन्यात मध्य प्रदेशचा ९-०, दुसऱ्या लढतीत दिल्लीचा ८-० व तिसऱ्या लढतीत गुजरातचा ४-१ असा पराभव केला.

# फॉर्म्युला-१मध्ये व्हेर्स्टापन सलग दुसऱ्यांदा विजेता

**सुझुका : वृत्तसंस्था**

रेड बुलच्या मॅक्स व्हेर्स्टापेनने सलग दुसऱ्यांदा फॉर्म्युला-१ स्पर्धेचे विश्वविजेतपद मिळविले आहे. जपानमध्ये सुझुका येथे झालेली जपान ग्रँड प्रिक्स शर्यत जिंकून व्हेर्स्टापेनने विश्वविजेतपदावर शिक्कामोर्तब केले.

व्हेर्स्टापेनने सुरुवातीपासून आघाडी टिकवून ठेवली. रेड बुलच्याच सर्गिओ पेरेझने दुसरा, तर फेरारीच्या चार्ल्स लेक्लेर तिसरा क्रमांक पटकाविला.




# धोनीची नवी इनिंग

## चित्रपटात साकारणार भूमिका




**रांची : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी जगातील महान खेळाडूंपैकी एक मानला जातो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर असलेल्या धोनीने आता फिल्मी विश्वावर अधिराज्य गाजवण्याची तयारी केली आहे. त्याचा अद्याप हिरो बनण्याचा कोणताही विचार नसला तरी त्याने स्वतःचे प्रोडक्शन हाऊस सुरू केले आहे.

माहीने त्याच्या प्रोडक्शन हाऊसचे नाव धोनी एंटरटेनमेंट ठेवले आहे. लेट्स सिनेमाने ट्वीट करून ही माहिती दिली. त्यात एक फोटोदेखील शेअर केला गेलाय ज्यामध्ये धोनी दिसत आहे आणि त्याच्या प्रोडक्शन हाऊसचे नावदेखील आहे.

सूत्रांकडून अशी माहिती समोर येत आहे की, धोनी आता फिल्मी दुनियेत लवकरच पाऊल ठेवणार असून तो स्वतःचे प्रोडक्शन हाऊस सुरू करेल. रिपोर्ट्समध्ये असा दावाही करण्यात आला होता की, धोनी साऊथचा सुपरस्टार थलपथी विजयसोबत एक चित्रपट करणार आहे. एवढेच नाही तर धोनी या चित्रपटात कॅमिओदेखील करू शकतो अशी अपेक्षा आहे. धोनीने स्वतः साऊथ सुपरस्टार विजयला फोन करून हा चित्रपट करण्यास सांगितले आहे. धोनीच्या प्रोडक्शन हाऊसच्या पोस्टरमध्ये असे समजते की, माही तीन भाषांमध्ये आपले चित्रपट बनवणार असल्याची आहे. यात भाषा तमिळ, तेलगू आणि मल्याळम आहेत.

## टी-२० वर्ल्डकप सराव सामन्यातही सूर्याचे अर्धशतक

**सिडनी** : टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या तयारीत असलेल्या भारतीय संघाने पहिला सराव सामना जिंकला आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविरुद्ध १५८ धावा केल्या. प्रत्युत्तरात वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा संघ १४५ धावा करू शकला. या सामन्यात भारताकडून सूर्यकुमार यादवने सर्वाधिक ५२ धावा केल्या.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com